# डॉ. नितीन मोरे



# साठा प्रश्नांची कहाणी

नाटक

# साठा प्रश्नांची कहाणी

## (नाटक)

डॉ. नितीन मोरे

ई साहित्य प्रतिष्ठान

# साठा प्रश्नांची कहाणी

लेखक:- **डॉ. नितीन मोरे,**

श्वसनरोग तज्ञ

वसई, जि, पालघर.

Mobile No. 98209 37490, 98696 73415.

Email - drnmore@yahoo.com

या पुस्तकातील लेखनाचे सर्व हक्क लेखकाकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण वा नाट्य, चित्रपट किंवा इतर रुपांतर करण्यासाठी लेखकाची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे. तसे न केल्यास कायदेशीर कारवाई (दंड व तुरुंगवास) होऊ शकते.

This declaration is as per the Copyright Act 1957. Copyright protection in India is available for any literary, dramatic, musical, sound recording and artistic work. The Copyright Act 1957 provides for registration of such works. Although an author's copyright in a work is recognised even without registration. Infringement of copyright entitles the owner to remedies of injunction, damages and accounts.

प्रकाशक- ई साहित्य प्रतिष्ठान

www.esahity.com

esahity@gmail.com

Whatsapp- 9987737237 (फ़्री पुस्तकांसाठी नाव व गाव कळवा)

प्रकाशन :- २५ जून २०२४

©esahity Pratishthan®2024

- विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध.
- आपले वाचून झाल्यावर आपण हे फ़ॉरवर्ड करू शकता.
- हे ई पुस्तक वेबसाईटवर ठेवण्यापुर्वी किंवा वाचनाव्यतिरिक्त कोणताही वापर करण्यापुर्वी ई साहित्य प्रतिष्ठानची-लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे.

# डॉ. नितीन मोरे



डॉ. नितीन मोरे हे व्यवसायाने डॉक्टर असून वसई, मुंबई येथे श्वसनरोग तज्ञ म्हणून सुप्रसिद्ध आहेत. त्यांना मराठी व इतर भाषा विषयांची आवड असल्याने त्यातूनच लिखाणाची आवड निर्माण झाली. सामान्यत:- आजूबाजूच्या दैनंदिन घटनांतील विसंगती व त्यातून निर्माण होणारा विनोद हा त्यांचा आवडता विषय आणि त्यातून उपरोधात्मक लिखाण आणि मर्मभेदी टिप्पणी करण्यात ते माहीर आहेत. त्याचबरोबर आजूबाजूच्या व्यक्तीमधले नेमकेपण हेरून त्यावरही ते हीतात. त्यांच्या लेखनाचा कॅनव्हास नवनवीन प्रयोगांतून कायम विस्तारत असतो. त्यात पत्रलेखन, विज्ञानकथा, कहाण्या, नाटके, एकांकिका, नाट्यछटा, प्रेमकथा हे सर्व असते.

नेहमी दिवाळी अंकातून डॉक्टरांच्या विनोदी कथा प्रकाशित होत असतात. ई साहित्यवर त्यांचे हे बावन्नावे पुस्तक प्रकाशित होत आहे. त्यांचा स्वतःचा असा एक वाचकवर्ग आता निर्माण झाला असून तो त्यांच्या पुस्तकांची वाट पहात असतो.


**Mobile No. 98209 37490, 98696 73415.**

**Email -** drnmore@yahoo.com

# साठा प्रश्नांची कहाणी

## नाटक

### लेखक : डॉ.नितीन मोरे



# साठा प्रश्नांची कहाणी!



रंगमंचावर अंधार. एका बाजूला विजय उभा आहे. प्रकाश त्याच्यावर

विजय:

नमस्कार मंडळी. आज कित्येक दिवसांनी राजा विक्रमादित्य बाहेर निघालाय. हातात तीच तळपती तलवार घेऊन. विक्रमादित्य निघालाय तर वेताळ त्याची पाठ कशी सोडेल? तसा आज देखील वेताळ त्याच्या पाठीवर आरूढ झालाय.. आणि आपले कथा कथन सुरू करतोय.. विक्रम्रादित्य अर्थातच कान देऊन ऐकतोय..

प्रकाश रंगमंचावर.

स्थळ: विजयचे घर

अजय आणि विजय दोघे बोलत आहेत.

१.

बाहेरून आवाज

**जबतक सूरज चांद रहेगा**

**मुर्दा तेरा नाम रहेगा..**

**मुर्दा**

**अमर रहे..**

**मुर्दा**

**अकबर रहे..**

**मुर्दा**

**अँन्थनी रहे..**

**मुर्दा हमारी जान है**

**मुर्दा हमारी शान है**

**मुर्दा हमारा मान है**

**मुर्दा हमारा इमान है**

**मुर्दा हमारी पहचान है**

**मुर्देबिना वीरान है..**

**रामनाम सत्य है**

**मुर्दा बिनधस्त है ..**

**रामनाम सत्य है**

**मुर्दा बिनधस्त है ..**

अजय:

ह्या कसल्या घोषणा? मेलेलं कोबडं आगीला भीत नाही म्हणा. तो मुर्दा बिनधास्तच असायचा..

विजय:

नॉट बिनधास्त.. यमकाच्या सोयीसाठी बिनधस्त! यमक न होवो उद्ध्वस्त! शब्दांची बिनधास्त तोडमोड करा नि 'मुख्यमंत्री यमक जुळवा योजने'अंतर्गत कवितेच्या पंक्ती लिहून कविजनांच्या पंक्तीत बसा!

अजय:

पण.. एका कोंबड्याची अंत्ययात्रा? एक कोंबडीकी मौत इथवर ठीक आहे.. पण डायरेक्ट अत्यंयात्रा..?

विजय:

अर्थात. इव्हन कोंबडी जगत झालंय प्रगत! मनुष्याची कॉपी करणार नाही? कोंबडा कोंबडीची लग्नं पण साग्रसंगीत तीन तीन दिवस होतात म्हणे हल्ली! अगदी संगीत नि हळदी सकट! त्यात हुंडा नि मानपान देखील असतं बरं!

अजय:

तुला कसं माहिती? कोण्या चोंबड्या कोंबड्यानी सांगितले की काय?

विजय:

मला ठाऊक आहे! आणि का होणार नाही? आणि त्यांनी सांगितलेलं आठवतंय? सबका साथ सबका विकास! तेव्हा कोंबडी ऑल्सो इज अ पार्ट ऑफ विकास. विकास विकास म्हणजे अजून काय असतो? प्रथा नि परंपरा नि

आधुनिकता यांचा अनोखा संगम! महाकाय हत्ती पासून सूक्ष्मकाय मुंगीपर्यंत सर्व सृष्टीसमष्टीचा विकास.. त्यात कोंबड्यांनी काय घोडं मारलंय?

अजय:

व्हॉट? कोंबड्या बनल्या हिंसक? घोडे मारू लागल्या?

विजय:

शब्दांचा पाडू नकोस कीस! करू नये हिडिस फिडिस! इथे कोणत्याही कोंबडा अथवा कोंबडीची अंत्ययात्रा जात नाही आहे. ते फक्त लाक्षणिक अर्थाने केलेले विधान होते! मेलेले कोंबडं आगीस भीत नाही! हा वाक्प्रचार आहे..

अजय:

ज्याचा तुला प्रचार करायचा आहे? तू प्रचारभारतीचा अधिकारी वगैरे आहेस की काय? हम आकाशवाणी मुंबई से बोल रहे हैं. सकाळची आठ वाजून चोवीस मिनिटे झाली आहेत.. आता ऐकूया विधीने केलेलं विधान! ते असेल ठीक पण अंत्ययात्रेत अशा घोषणा?

विजय:

अर्थात! मरणांतानि ओळखान्ताणि.. म्हणजे मरणानंतर माणसाची ओळख संपते. शेवटी राहते काय? मुर्दा! मुर्दाड नव्हे! जाळल्यास राख.. पुरल्यास हाडं ..

अजय:

अरे हाड! काहीतरीच. कोंबडी मेली नाही तर आम्ही तिला मारून टाकतो.. नि बनवतो किचनमें  चिकन, तंदुरी! मेलेली कोंबडी तंदुरास घाबरत नाही आणि आम्ही तंदुरी चिकनास घाबरत नाही! घाबरणार कसले! फाडून खातो आम्ही! आणि आम्ही तर मेलेल्या वाघसिंहांस ही घाबरत नाही! ते ही स्वत: जिवंत असताना! स्वत: म्हणजे आपण स्वत:, वाघोबा नव्हे!

विजय:

शब्दच्छल! शब्दच्छल नुसता तो ही कारण नसता! नुसता शब्दसिंह आहेस झालं. नरसिंहाचा सख्खा भाऊ! पण माझं म्हणणं असं आहे, जिवंतपणी घाबरू नका.. पण मेल्यावर त्या आकाशातल्या बापास हिशेब द्यावा लागेल त्याचा तरी विचार करा..

अजय:

कां कि तिकडे तो बाप उघडून बसेल पीपी च्या चोपड्या..

विजय:

पी पी? हॉर्न आहे की काय?

अजय:

हॉर्नच! पीपी म्हणजे पाप पुण्याचं फुंकलेलं शिंग! म्हणजे हॉर्न! तर तो गगनस्थ अंबरनाथ..

विजय:

अंबरनाथ? की बदलापुर?

अजय:

वत्सा.. तुजप्रत कल्याण असो! तर तो अंबरीश पीपीबुक्स उघडून बसेल.. त्यावेळी सिलेक्शन होईल.. एस की एन!

विजय:

एस की एन? आता हे काय नवएन?

अजय:

तुमच्या पीपी स्कोअर वर अवलंबून.. एस की एन.. स्वर्ग की नरक! तिकडे गेलात की मग पाठवणार ते एस सेक्शन किंवा एन सेक्शन! बाय द वे पी पी अकाउंट इथूनच अपडेट करावा लागतो.. पीपी क्रेडिट पॉइंट्स गोळा करून ठेवायचे. पुण्याचे क्रेडिट वजा पापाचे डेबिट! जो बॅलन्स त्यावर, मग पाठवणार तुम्हाला..

विजय:

आणि दोन्ही बरोबरीचे असले तर?

अजय:

समजेल.. पण तुला काय गरज? तुझी एन सेक्शन मध्ये पाठवायची तयारी ही झाली असेल!

तुला नो चान्स ऑफ एस!

विजय:

व्हाय व्हाय? आठव ते तुझ्यावर केलेले असंख्य उपकार! का नाही ते अकाउंटमध्ये काउंट होणार? अगदी शाळेपासून ते आजपर्यंत! ते शाळेत असताना परीक्षेच्या दिवसात तुझं पेन संपलेलं.. तेव्हा मी उसनी दिलेली शाई.. झाडावर चढलेलास कैरी काढायला तेव्हा तो राखणदार आलेला त्याच्यापासून तुझी सुटका व्हावी म्हणून त्याला कसे पटवलेले.. तुझ्या सायकलच्या टायरात कितीदा हवा भरून दिली मी त्याची गणती नाही..

अजय:

जगात फुकट मिळणाऱ्या हवेचे दान करून फुकटचे पुण्य गोळा करू पाहतोस? आणि तसा हिशेब तेव्हाच्या तेव्हा मिटवतो मी.. शाई दिलीस तर मी तुला पेनच दिले नंतर! सायकलवर कितीदा डबल सीट घेतलं आणि आठव ती दात आंबले तरी तू खाल्लेली एक्स्ट्रा कैरी!

विजय:

कैरी? कैरी नव्हे, तू तर हिशेब ठेवणारा वैरी!

अजय:

तू आता म्हणणारच तसं काही! गरज सरो वैरी मरो!

विजय:

अरे, वैऱ्याला ही असा मित्र मिळू नये.. एहसान फरामोश! आणि इतक्यात ती उपकारांची मालिका संपली नाही बरं. अरे, सिरियल बनवली तर पाचसातशे नाही, पाचसात हजार एपिसोड्सचा डेली साबण बनेल..

अजय:

साबण?

विजय:

अर्थात! डेली सोप! सिरियल! सासू सून विरहित ती ही! एक एपिसोड, एक उपकार! आणि एक उपकार, एक पुण्य पॉईंट!

अजय:

तसा पॉईंट आहे बोलण्यात तुझ्या! आणि तसेही तू स्वर्गात आलास तर बरंच आहे, मला एकट्याला किती बोअर होईल!

विजय:

वा! पुण्यवान पापी! की पापवान पुण्यी? बापरे! ही कठीण भाषा आहे बोलायला. पापवान! भाग्यवान! तुला काय जन्मजात 'उघडले स्वर्गाचे दार' असं वाटतंय कां? आठव, त्या कैऱ्या तू चोरल्यास त्यात पापाचे किती पॉईंटस जमा झाले असतील?

अजय:

त्या पापात तू वाटेकरी नव्हतास?

विजय:

अर्थात नाही!

अजय:

म्हणजे मी वाल्या कोळी?

विजय:

अर्थात. बस तपाचरणास.. युवर टाइम स्टार्टस नाऊ! मुंग्यांना पाठवून वारूळ बांधून घेण्याची जबाबदारी माझी. आणि तसा गोड आहेस तू.. मुंग्या येतीलच.. आय हॅव हर्ड विद्यावहिनी सेइंग धिस!

अजय:

काय म्हणाली ती? मुंग्या येतील? तपाला बसलं मांडी घालून तर मुंग्या येतीलच म्हणा पायाला!

विजय:

इतका गुंग होऊ नकोस.. तू गोड आहेस म्हणत होती!

अजय: (लाजत)

ती ना.. काही ही बोलत असते!

विजय:

खरंय.. तर कडू कारल्या.. प्रेमीजनांना काय वाट्टेल ते वाटेल! पण मुद्दा तो नाही! पापपुण्याचा आहे! अरे, डबल सीट घेऊन दोनदा मला धाडकन पाडलंस, एकदा डाव्या गुडघ्याच्या उजव्या बाजूस इजा झालेली गंभीर, त्याचं काय? मला दिलेल्या पेननी लिहिले नि त्या परीक्षेत माझी गटांगळी.. किती बरे जमा करशील नकारात्मक पॉईंट्स?

अजय:

वा! जसं काही पेनामुळे तुझ्या बथ्थड डोक्यात प्रकाश पडणार नि तू लिहिणार? अरे, एका निरक्षराने मोतीबिंदूचे ऑपरेशन करून घेतले.. डॉक्टरला विचारले, मला ऑपरेशन नंतर लिहितावाचता येईल का? गॅरंटी घेतली.. नि मग? जो आड में नहीं वो पोहरेमें कहांसे आएगा? मग उगाच माझ्या पापाच्या घड्यात टाकतोयस खडा! आया बडा!

विजय:

चंदन उगळावे तितके सुगंधी आणि कोळसा उगळावा तितका काळाच! जाऊ देत!

अजय:

जाऊ देत तर जाऊ देत! मुद्दा कोंबडीच्या तंगडीचा नि आपण घालतोय लंगडी! कुणी पाहिलंय ते एस आणि एन!

विजय:

वाद आम्ही नाही, तुम्हीच घालत आहात! आमचे पुण्य वादातीत आहे!

अजय:

असेल! मित्रसंगतीचा परिणाम होतोच! तेव्हा त्यात आश्चर्य वाटावे असे काही नाही!

विजय:

तरीही आमच्या क्षात्रतेजातून आम्ही श्राप देतो.. जा, ऐन वेळी तुज विद्येचे विस्मरण होईल..

अजय:

स्वामी विजयानंद, इतके कठोर वचन? इतका कठोर शाप? या शापावर काही उ:शाप?

विजय:

अर्थात, विद्येने तुझे स्मरण केले तर तुला ही विद्या स्मरेल!

अजय:

दोन्हीचा अर्थ एकच होतो स्वामी!

विजय:

हुशार आहेस, शहाणा आहेस, दीड! विद्येने स्मरण केल्यास तुला विद्येचे स्मरण होईल!

अजय:

थ्यांक्यू स्वामीजी.. कु. विद्या आमचे स्मरण अहर्निश आणि दिवसरात्र, अष्टौप्रहर करत असते.. स्वामी नव्हे, शकुनी मामा नव्हे, अपशकुनी मामा तुम्ही! तर ह्या स्वामी विजयानंदरूपी कावळ्याच्या शापाने ही अजयानंदाची गाय मरणे.. अशक्य!

विजय:

धिस गाय इज इम्पॉसिबल!

## २.

स्थळ तेच. विद्या येते.

विद्या:

गेले कुठे? कुठे आहे अजय? नि त्याचा जुळा मित्र  विजय? जुळा मित्र? ही नवीनच भानगड! पण कित्येक वर्षांपासून दोघे सावलीसारखे एकसाथ आहेत! फक्त कोण कोणाची सावली हे ठरवावे लागेल! नाहीतर भांडतील, सख्ख्या भावांसारखे! विजय आणि अजय!

अजय म्हणजे.. इश्श!

नाही म्हणजे मी अष्टौप्रहर त्याचाच विचार करत असते. माझा अजय.. कुठे रे गेलास? जिथे कुठे असशील तिकडून असशील तसा निघून ये. तुझी विद्या तुझी वाट पाहात खंगत चालली आहे. गेल्या अर्ध्या तासापासून तिने अन्न, नि गेल्या पाव तासापासून पाणी सोडले आहे. तेव्हा लवकरी ये, झडकरी ये.. विद्येच्या या सासर सम घरात ये. आर्त स्वरात मी मारते हाका.. ये नाहीतर प्रसंग बाका! कोण म्हणतेय?

माझा काका!

तुम्हाला नाही कळायच्या प्रेमी जिवांच्या जीव कळा!

जीव कळा म्हणजे कुछ नाही कळा? न कळो.

न वळो.. इडापीडा टळो. अमंगळ जळो. अजया जल्दी पळो नि इकडे वळो!

अरे, अजय म्हणजे माझा श्वास, माझा ध्यास! अजय म्हणजे माझा विश्वास!

विश्वास!

त्याला नको सांगायला नाहीतर साहेब बसतील झोडत लेक्चर! म्हणेल तो, बरंका विद्या बाई, विश्वास इज व्हॉट विश्वास डझ! म्हणजे जे सिद्ध करता येतं तो विश्वास! जे सिद्ध करण्यापलिकडे ती श्रद्धा! आणि ज्यास न शेंडा न बुडखा ती अंधश्रद्धा! असेल! मला काय त्याचे! पण अजय उगाच गहन विषयांवर गहन बोलतो काय.. मी ऐकते नि सोडून देते! तुम्हाला खरं नाही वाटणार पण ते खरंय! तो गहन बोलतो हे ही खरंय नि मी सोडून देते हे ही खरंय! घाबरते की काय?

*विजय आत येतो..*

विजय:

विद्या तू? कधी आलीस?

विद्या:

कधीच! पृथ्वीच्या प्रेमगीतासारखी गीतं गात युगानुयुगे उभी आहे इथे .. फिरण्यासाठी माझ्या प्राणसूर्याभवती.. एकच आस घेऊन त्या आशेवरती उभी..

विजय:

कर्कवृत्तावरी नि कर्कटकावरी ठेऊनी 'म'कर!

विद्या:

मकर? आणि कर्कवृत्त? तुझी ही वृत्ती नव्हे बरी!

आणि कर्कटक? नव्हे, कर कट.. कटीवरी! उगाच शब्दजंजाळात फसवण्याचा कट करू नकोस! कटकट नको काय? माझा अजय कुठेय?

विजय:

अजय? दॅट फेल्युअर?

विद्या:

का? का? फेल्युअर का?

विजय:

अर्थात.. नाव सोनुबाई, हाती नाही इव्हन कथिलाचा वाळा! अरे अजय बाळा! नाव 'अजय' आणि धिस विद्या हॅज वन ओव्हर यू! जिंकलं की तिने तुला. मग कसला राहिलास अजय? नाम बडे और..

विद्या:

दुर्गा खोटे!

विजय:

काय उपयोग त्या अजयपणाचा?

विद्या:

तपशिलात चूक होतेय महाशय! मी जिंकले नाही.. त्यानेच चोरले दिल माझे..

विजय:

चोरले? चोर लेकाचा! हरामचोर! नव्हे हरामखोर! सवयच त्याची. लहानपणापासून पाळण्याऐवजी त्याचे पाय कैरी नि पेरूच्या झाडांवर दिसायचे. अस्मादिक साक्ष आहेत.. तिखट मीठ घेऊन मीच उभा असायचो खाली! कुठे फेडिशी पाप हे?

विद्या:

आणि तुला पण लागलेच असणार ते.. पाप. पार्टनर इन क्राईम!

विजय:

तू क्राईमब्रांच मध्ये कामाला लागलीस की काय? बट आय टेल्यू, इट्स प्राईम.. दॅट..

विद्या:

आय इग्नोअर धिस क्राईम? अरे, त्या अजयचा ना विश्वास पाप पुण्यावर. त्याचा ना विश्वास अशा तशा वर! म्हणतो त्याचा विश्वास आहे फक्त स्वत:वर! स्वयंभू आहे जणू!

विजय:

खरंय.. भू भू! स्वयंभू!

विद्या:

आणि काल घनघोर चर्चा झाली म्हणे पापपुण्याबद्दल.. माझ्या कानी बातमी आली..

विजय:

हुं.. बातमी कसली? तो अजय प्रियकर कम भुंगा लागला असणार कानी.. पण प्रेमिक असल्या गोष्टी ही कानोकानी करतात की काय?

विद्या:

तुझ्या विश्रब्ध शारदेस विचारते..

विजय: (लाजत)

कसलं काय.. फाटकात पाय! विश्रब्ध नव्हे प्रक्षुब्ध शारदा आहे ती! अजय भाऊ आमचे करामती करण्यात पटाईत.. चमत्कार घडवतात.. 'विद्या'र्जन त्यांना जमले सहजी. पण माझ्यासाठी शारदोत्सव ही दूरची बाब. अजय नावाचं कार्ट अगदीच निघालं स्मार्ट! काश! हम भी होते उसके जैसे!

विद्या:

उगी उगी. आपण आणू हां विजय बाळासाठी गोरीगोरी पान फुलासारखी छान..

विजय:

सच्ची?

विद्या:

मुच्ची! पण व्हेअरिज माय अजय?

विजय:

तुझा असेल तुजपाशी .. पण अजया.. जागा चुकलाशी!

विद्या:

उगाच नको मखलाशी!

विजय:

मी बोलतो पुढचा डायलॉग.. कुठे आहेस ह्या विद्येच्या प्रिय प्रियकरा, प्राणसूर्या.. प्राणचंद्रा.. प्राण शुक्रा.. प्राणमंगळा.. टपोऱ्या डोळ्यांत आणून टिचभर पाणी, वाट पाहाते इकडे तुझी राणी! गाते प्रीतीची झुळझुळ गाणी! येई तू पटकनी.. सर्व आळस तुझा झटकुनी!

विद्या:

माझा अजय आणि आळस? नो! नाय! नेव्हर!

अजय आत येतो..

अजय:

सॉरी.. थोडा उशीर झाला..

विद्या:

थोडा? प्राण कंठाशी आलेला प्राणनाथ..

अजय:

प्राणप्रिये.. क्षमा असावी.. जिवीच्या जिवलगेस भेटण्यास आतुर मी..

विद्या:

तीच आग लागलेली इकडे ही. विरहाच्या अग्नीत दग्ध होत होते रे मी माझ्या जिवाच्या पोपटा..

विजय:(हळूच)

हे खरंय! चोरून पेरू खाणारा पोपट!

अजय:

आता मी आलोय ना राणी. घेऊन आगीचा बंब! विझवेन मी तो वन्ही.. झाल्या जरी सांजा तिन्ही. आणू का तोडून ते गगनीचे तारे?

विद्या:

नको रे सजणा.. अंधारात कसा जाशील? आणि उजेडात दिसतील कसे ते तारे? आणि गेलास नि येण्यास उशीर झाला तर?

अजय:

नकोच ते. क्षणाक्षणाचा विरह नच साहवेना.. प्रिये तुझ्या नयनातील पाणी मज पाहवेना..

विजय: (कानात बोटे घालत)

चालू द्यावे प्रियाराधन.. उगाच कबाब में हड्डी कशाला? आपण शांत रहावे उभे.. की ऐकावे? शारदेशी संवादात उपयोगी पडेल असे काही मटेरियल? छे! ती प्रक्षुब्ध शारदा! एक शब्द बोलेल तर शपथ..

अजय:(विजयकडे पाहात)

कानात बोटे घातली तरी तोंड चालू शकते.. पण त्रस्त समंधा, शांत रहा.. तर प्रिये, विलंबाबद्दल खेद आहे.. टाइमपर आने के पूरे प्रयास जारी थे! पण काय करणार? माझ्या गाडीसमोरून एक मावशी आडवी गेली..

विद्या:

मावशी?

अजय:

वाघाची गं! अपशकुनामुळे मग आम्ही सात स्टेशनं मागे गेलो नि परत आलो. त्यामुळे थोडा विलंब झाला!

विद्या:

इथे माझ्या डोळ्यांच्या खाचा व्हावयाची वेळ आली. आणि मांजर आडवी गेल्याने मी सात पावले मागे गेले त्याची अशी खिल्ली उडवावीस तू? तरी बरे

काल तुम्हीच पापपुण्याच्या गोष्टी करत होतात इकडे! असते एकेकाची अंधश्रद्धा!

अजय:

इतके फुरंगटून बसायला नको! कान पकडून सॉरी! पण भाकड गोष्टींत वेळ का दवडावा?

विद्या:

तेच म्हणतेय मी! एकतर उशीरा आलास.. इथे (विजयकडे पाहात) भाकड गोष्टीत वेळ दवडावा? निघूया..

अजय:

ह्या विजयला घेऊन जाऊया? कान बंद आहेत त्याचे!

विजय:

पण डोळे उघडे आहेत रे!

अजय:

आणि तोंड देखील! त्यापेक्षा चौपाटीवर जाऊन मावळत्या सूर्यास साक्ष ठेऊन भेळ खात जमवू मेळ.. पाहूया स्वप्ने आणि मारूयात गप्पा..

विजय:

अन प्रेमकथेचा गाठूया पुढचा एक टप्पा!

अजय नि विद्या हातात हात घालून जातात ..

विजय:

सांभाळा रे! चौपाटीवर येतील नाहीतर लाठीधर विद्येचे, नव्हे, विद्येचे लाठीधर अप्पा! मारायल पाठीवर ठप्पा!

३.

स्थान: समुद्र किनारा.

अजय आणि विद्या बसले आहेत समोरच्या रेतीत.

विद्या:

किती मस्त सुटलाय वारा नाही?

अजय:

अगं गोमू.. माझ्या पिरतीचा आहे तो.. सुटलाय तुफान वारा.. वारा..

विद्या:

हुं.. धड वेळेवर येता येत नाही नि उगाच वारं सुटलंय म्हणतो.. मी रागावलेय. जा उडत जा.. वाऱ्यासारखा

अजय:

पवनसुत? पण नको राणी नको रुसू.. येऊ दे गं गाली हासू.. नाहीतर येईल झाडू घेऊन सासू..

विद्या:(हळूच हसत)

कायपण!

अजय:

कायपण नाय काय! मुख्यमंत्री यमक जुळवा योजनेअंतर्गत मिळालेत हे शब्द! अजून एक आहे .. विद्या राणी.. दिसतेस आज गं तू ढासू..

विद्या:

शी! हा काय शब्दय रे? उद्या म्हणशील चल जुळतंय यमक.. आपण भांडी घासू! तुझा काही नेम नाही!

अजय:

आहे ना! अजय! अजै नाम है मेरा. काम है दिलको चुराना..

विद्या:

तू ना! नीट रागावू पण देत नाहीस. याचा मला अजून राग येतो!

अजय:

चल मग, सिनेमा काढू. अल्बर्टा पिंटी के नाक के शेंडेपर राग क्यूं आता है!

विद्या:

तू पण ना! देवाने तोंड दिलं म्हणून बोलत सुटायचं!

अजय:

असंच नाही काही! अजून ही तोंडाचे उपयोग आहेत.. पण इकडे सर्वांसमोर..

विद्या:(कृतक रागाने)

अजय.. चावट शिरोमणी

अजय:

मी? बघ समोरी साक्षीस आहे दिनमणी! थोड्याच वेळात हा डुबेल.. नि अंधार होईल.. अंधार म्हणजे प्रकाशाचा अभाव! जिथे उजेड आहे तिथे अंधार नाही नि जिथे अंधार आहे तिथे उजेड नाही!

विद्या:

अकलेचा चांगलाच पडतोय उजेड! अंधेरीत राहतोस म्हणून की काय?

अजय:

वा! तुलाही कोटी कोटी कोट्या करणं जमू लागलं राणी! अशाने लवकरच कोट्याधीश होऊ आपण नि आपल्या घरी भरेल विनोद पाणी! ऋद्धीसिद्धीं ऐवजी! पण तुला ठाऊकै कित्येक वर्षांपूर्वी ह्याच सूर्याने कोणाकोणाचा जीव घेतलाय?

विद्या:

म्हणजे?

अजय:

फक्त सूर्य पृथ्वीभोवती फिरतोय, नव्हे.. पृथ्वी सूर्याभोवती फिरतेय ह्या सत्यकथनासाठी! कोणाचा जीव घेतला, एकाला जाळून टाकलं काय.. एकाला आयुष्यभर कैदेत टाकलं काय! अजून काय काय! असला असतो अंधश्रद्धेचा बाजार बरं! अजूनही तिकडे परदेशात फ्लॅट अर्थ सोसायटी आहे जी समजते पृथ्वी सपाट आहे! म्हणजे अंधश्रद्धा ही आपलीच काही मोनोपॉली नाही. सर्वच देशांत आहे ती, शेवटी मनुष्य स्वभाव तो. कुठे कमी कुठे जास्त! विशेष विचार न करता जिथे कमीत कमी डोक्याचा वापर लागेल ना ते ॲक्सेप्ट करायचं! मग त्यात तर्क सुसंगत काही नसेल तरी चालेल!

विद्या:

अजय साहेब.. तर्काची गोष्ट करताय? स्वत: उशीरा आलात त्याचे तार्किक कारण मात्र सांगत नाहीत!

अजय:

उशीर झाला म्हणून तुझ्या शिरावरची शिर तडतडतेय अजून?

विद्या:

उगाच वाकड्यात शिरू नकोस!

अजय:

शिरूबाई! अजून नाकाच्या एव्हरेस्टसारख्या शेंड्यावरचा राग गेलेला नाही वाटतं! शिरस्त्राण घालून बसायला हवं होत! नाहीतर शिरकाण करशील..

विद्या:

हे रे काय? मी खरंच रागावणारै. नीट रागावू देत नाहीस म्हणून!

अजय:

ओ हो! तो अब तक था गुस्सा झूठा!

विद्या:

हॅट! आलाय मोठा! मावळत्या सूर्यास साक्षीस ठेऊन सांगतेय, मला तू अजिबात आवडत नाहीस..

अजय:

असं म्हणतेस! काइंडली रिकन्सिडर.. डिअर देवता ऑफ हार्ट, धिस इज फ़ॉर युवर काइन्ड अटेन्शन अँड कन्सिडरेशन फ़ॉर बीइंग काइन्ड टू धिस मॅन फ्रॉम मॅनकाइन्ड अँड ॲलॉट अ प्लेस इन वन ऑफ द चेंबर्स ऑफ युवर हार्ट..

*विद्या हसते..*

अजय:

थ्यांक्स फ़ॉर द हार्टी लाफ.. थँकिंग्यू फ़ॉर गिव्हिंग द होल हार्ट!

विद्या:

चुप रे! तुला ओसरी दिली तर लगेच हातपाय पसरी?

अजय:

व्हाय नॉट! हीच तर आमची स्पेश्यालिटी आहे! आमचे इकडे ओसरी दिल्यास हात पाय पसरून मिळतील! तत्काळ संपर्क..

विद्या:

तू काहीपण बोलत असतोस..

अजय:

तरीपण, की म्हणूनच.. तुला आवडतो?

विद्या:

कोण? कोणी सांगितलं?

अजय:

तुझ्या गोबऱ्या गालावरच्या गोंडस गुलाबी गुलाबांनी फोडले बरं गोड गुलाबी गुपित!

विद्या:

तू काय जुन्या पुराण्या कादंबऱ्या वाचतोस की काय? गालावरचे गुलाब म्हणे!

अजय:

होय! मी आहे पोथी शरण! पोथ्यापुस्तकांस प्रमाण मानणारा! काय ऑब्जेक्शन आहे या बटमोगऱ्याचं?

विद्या: (लाजत)

तू पण ना.. असा आहेस! पण मला टेन्शन आहे रे पुढे काय होईल?

अजय:

हुं.. पूछो ना यार क्या होगा? जाने हमारा आगे क्या होगा?

विद्या:

तुझ्या घरातून ..

अजय:

विषयच नको राणी! प्रेमविवाह म्हणजे नाहीच.. त्याला कारणं चिटकवतील जात, पोटजात वगैरे, न तुला माहित न मला आपली जात! पण न सांगितलेलं मुख्य कारण म्हणजे हुंडा! अगं, प्रागतिक समाज आहे, हुंड्याचं नाव न घेता वरदक्षिणा मागेल. शेवटी पोस्टग्रॅज्युएट आहे हा मुलगा! (कॉलर टाइट करत) वर पर्मनंट नोकरी! तुमची मुलगी सुखात राहिल बरं.. एक लाख प्लस छोकरी.. पटतं तर घ्या!

विद्या:

भय्या, थोडा कम करो ना.. रोजके गिऱ्हाइक को थोडा तो..

अजय:

भय्या? डायरेक्ट?

विद्या:

आणि माझ्या घरी तर सारंच दिव्य! कोणी बाबा किंवा बुवा सांगणार नि मग ते ऐकणार!

अजय:

मला तर वाटतं ना हेच करियर बेस्ट! बी अ बाबा किंवा बुवा! इमॅजिन मी इंग्रजीत फाडफाड बोलणारा अजूबाबा नि तू .. विद्यामयी देवी माँ! आपला आश्रम

असेल.. मस्तपैकी राहू. समाजमान्य, लोकमान्य, सरकारमान्य उत्कर्षाचा रस्ता! मी प्रवचन देईन.. वत्स! उठ आणि बघ! ह्या भवसागरातील तू एक क्षूद्र कृमी कीटक! अखंड विश्वाच्या पसाऱ्यात कुणाच्याही खिजगणतीत नसलेला. तुझा उद्धार व्हायचा असेल तर या अजैबाबास शरण जा.. माँ विद्यामयीदेवीच तुझे कल्याण करील..

विद्या:

तू काहीपण, कितीपण, कसेपण बोलू शकतोस?

अजय:

अर्थात.. बोलणे ही आमची स्पेशालिटी आहे सरकार! असे बाबा, बुवा, देवी बनवायचे कोर्सेस काढायला हवेत! आय आय टी पेक्षा टफ स्पर्धा होईल बघ! सेल्फ एम्प्लायमेंट गॅरंटीड!

*विद्या एकाएकी उठते.. 'येते मी' लगेच म्हणत निघून जाते.. अजय तिच्याकडे पाहात राहतो..*

अजय:

लेट मी गेस! त्या देवळात गेली असणार! मला न सांगता! नाहीतर मी घेईन तिचं बौद्धिक. लहानपणापासूनची शिकवण आहे.. शेंदूर लावलेल्या दगडास नमस्कार! मग गल्लोगल्ली बसलेत दगड शेंदूर फासून! आमचा देव

देव्हाऱ्यातच कोंडून ठेवलाय. मग मोठमोठे संत खुशाल सांगोत.. देव कोठे कोठे जाणावा ते.. पण लक्षात कोण घेतो! संत महंत मंडळी ती! डायरेक्ट देवाच्या खालोखाल. त्यांचं म्हणणं बरोबरच पण आम्ही सामान्य माणसं त्यांच्याशी बरी करू बरोबरी?

जाऊ देत..

प्रियेची बघत बसावी वाट..

मग सुंदर वाटेल हा नदीचा घाट!

नदी? नव्हे हा तर सागर!

*थोडा वेळ शांतता. मग विद्या परत येते.. अजयच्या हाती प्रसाद देत..*

विद्या:

घे.. देवळात जाऊन आले..

अजय:

काय म्हणतात मग तुमचे भगवंत?

विद्या:

देव काय म्हणणार? पण तू काही ही म्हण! देवळात जाऊन मला मन:शांती मिळते.

अजय:

त्याबद्दल मी कधी काहीच म्हणालो नाही. देवळात जायला काहीच हरकत नाही. पण धर्माची देवळे बनवायला आहे.

विद्या:

मग तू का नाही आलास बरोबर?

अजय:

तू विचारलंस कुठे? काय मागितलंस देवाकडे?

विद्या:

तुझ्यासाठी अक्कल!

अजय:

थ्यांक्स! तुला देऊन संपत आलेली! तू वापरत नसशील तर दे परत! पण गंमत बघ, देवाला सर्वज्ञानी म्हणायचं, नि त्याच्याकडेच मागणं मागायचं! विरोधाभास किती?

विद्या:

पण तुला गरज आहे डेस्परेटली! थोडी अक्कल..

अजय:

आहे माझ्या चपलेला बक्कल! एवढे यमक बख्खळ?

विद्या:

तू काही बोलण्यात हार जाणारेस?

अजय:

काय करू? सध्या इथे तेवढेच करू शकतो! अगं पण लोकांनी देवाला ऑप्शनमध्ये टाकलंय! म्हणजे बघ, आपल्याकडे ऑल्मोस्ट सगळे आस्तिक असताना इतका भ्रष्टाचार कसा? कारण आपण देवाला सांगितलं, तिकडे देवळात नाहीतर देव्हाऱ्यात बसा गुपचूप! देऊ तो नैवेद्य स्वीकारा. नवस बोलू तो पुरवा मग फेडू आम्ही. उगाच आमच्या दैनंदिन बाबींत ढवळाढवळ नको! मग आम्ही भांडू तंडू, एकमेकांच्या उरावर बसू! फसवाफसवी करू. एकाच

देवाची लेकरे आम्ही म्हणत काळे पांढरे नि उच्च नीच म्हणत कोणास हीन लेखू! घबाड मिळत असेल तर लबाड वागायला हरकत नाही! तुला ठाऊकै एक मोठे देवालय आहे, संस्थान म्हण ना! तर काही व्यापाऱ्यांनी त्याला आपलं पार्टनर बनवलंय! म्हणजे चार व्यापारी नि पाचवा पार्टनर तो देव! मग ते भ्रष्ट मार्गाने मिळालेल्या नफ्याचा पाचवा हिस्सा त्या देवाला देतात! कॅश! प्रामाणिकपणे! आपण पण काढू कंपनी. तिसरा पार्टनर देव! मग तिसरा हिस्सा देवाचा!

विद्या:

चुप रे!

अजय:

नको! इतके कोण देणार. त्यापेक्षा बारा वर्ष थांबू!

विद्या:

बारा वर्ष?

अजय:

अगं, तू मी नि आपली डझनभर पोरं मिळून काढू कंपनी! मग पंधरावा हिस्सा देवाचा!

विद्या:(रागाने)

अजय..

अजय:

नाही तसं लवकर होऊ शकेल.. सहा जुळी झाली तर.. सहा वर्षात! किंवा चार तिळी.. चार वर्षात! मुख्यमंत्री जलदगती बालप्रा ॅडक्शन योजने अंतर्गत!

विद्या:

आता खरंच रागावणारे मी.. मी निघतेच कशी..

अजय:

कशी?

*विद्या उठून चालायला लागते. मागे पाहात..*

विद्या:

अश्शी!

४.

स्थळ:

अजयचे घर. दिवाणखाना. ज्योतिषाचार्य शिवदे गुरूजी बसलेत, समोर मानकर बाई.

शिवदे गुरूजी:

मानकरांचा मान वाढण्याची स्पष्ट लक्षणे आहेत वहिनी. त्यांचा भूतकाळ उज्ज्वल होता. भविष्य ही उज्ज्वल..

मानकर बाई:

हो बाई! गुरूजी तुम्ही असताना ते उज्ज्वलच असायचे..

गुरूजी:

भूत भविष्य तर होईल ॲडजस्ट, फक्त या वर्तमानाचे थोडे पहावे लागेल. थोडे ग्रह वाकडे तिकडे चाललेत. वक्री ग्रहांना लायनीवर आणावे लागेल. काही ग्रह उंटासारखे उंडारलेत. फेंगड्या चालीने चाललेत. त्यांना सरळ करावे लागेल. काही ग्रहांचा ग्रह असा झालाय की जणू कुंडलीतले डिक्टेटर! हिटलरी नि मुसोलिनी ग्रह! पण चिंता नको वहिनी.. हा स्टालिन शिवदे समर्थ आहे!

मानकर बाई:

गुरूजी, तुम्ही असताना चिंता कसली. तो स्टालिनबिलिन कसला, आमचे हे म्हणतात, गुरूजी तुम्ही म्हणजे माओ त्से उत्तुंग आहात! गेली पंधरा वर्षे तुम्ही आमचे फॅमिली ज्योतिषी. तीन चार फॅमिली डॉक्टर बदलले तुमच्या सल्ल्याने पण फॅमिली ज्योतिषी एकच, शिवदे गुरूजी.. तुमचा अनुग्रह असताना बाकी ग्रहांची चिंता कशाला? कुठल्या ग्रहास कुठल्या गृहात बसवावे हे गुरूजी तुम्हाला ठाऊक..

शिवदे:
खरंय पोरी..

*बाई 'पोरी' शब्द ऐकून लाजतात.*

शिवदे:
ग्रहांचे काय? आपली कक्षा सोडून ताळतंत्र सोडल्यासारखे वागायला लागले की त्यांना तंत्र नि मंत्र वापरून ताळ्यावर आणावंच लागतं. कक्षा सोडण्याची शिक्षा मिळायलाच हवी! तुमच्या धाकटीची नाही पार पडली दहावी? एक विषय राहणार होता पण बुधाच्या कृपेने राहूवर लगाम बसला नि इंग्रजीची नौका किनाऱ्यास लावली.

मानकर बाई:

हो ना! आमचे हे म्हणतात ना, भर भवसागराच्या तुफानात नौकानयन करायचे तर वल्ही हाती घेणारा वल्ली तसा ताकदीचाच हवा! तसा थोडाफार अभ्यास पोरीने केला होता म्हणा! पण तरी अभ्यासाने काय होते होय? बुधवारी उपास धरला.. बुधकर सरांचा क्लास लावला.. तेलाचे बुधले घेऊन बसायची अभ्यासास.. या बुधाकडून बोध इतकाच घेतला की ग्रहांना आपापली जागा दाखवून द्यायची तर तिथे गुरूजी तुम्हीच पाहिजेत. तुम्हाला कशा सगळयांच्या कुंडल्या पाठ आहेत. तुम्ही त्या खडे बाबांकडे पाठवलंत, ते खडे राहून खडा मारतात त्याचा उद्धार होतो. माझ्या कुमीला लागला हो खडा, डोळयाखाली अगदी पडला ओरखडा. डोळा बचावला पण. बाबांचीच कृपा. परीक्षा ही बुधवारी आली. सारं कसं जुळून आलं नि पार लागला तो इंग्रजीचा पेपर छत्तीस मार्कांनी. वाटलं एक विषय सुटतो की काय. पण गुरूजी तुमची कृपा आहे..

शिवदे:

तसं नाही बाई. अहो, आपण फक्त ज्ञानाचा उपयोग जगाच्या भल्यासाठी करायचा. बाकी तसे नवग्रह वरून करणी करत असतात. कुंडली कुंडलीतून त्यांना त्यांची जागा ओळखावी नि ज्याला त्याला त्याची जागा दाखवावी. ते कामच आमचे..

मानकर बाई:

होय गुरूजी. पण आजकाल बुवाबाजी बोकाळलीय इतकी. ते उघडे बुवा अस्सल भोंदू. तसेच ते काठी बाबा. नको बाबा, कानाला खडा. खरे बुवा म्हणजे ते खडे बुवा. बाकी सारे भोंदू. तुम्हाला पारख आहे म्हणून खडे बाबास शरण गेलो. अगदी नवस बोलले कुमीचे बाबा .. आमच्या मन्याला नोकरी लागली की हिरेजडित, अगदी खडा बसवलेल्या खडावा वाहीन खडेबाबांच्या पायाशी म्हणून..

शिवदे:

लागेल. नोकरी लागेल. मी त्याची कुंडली पाहिली आहे. थोडे उपास, थोडे व्रत, थोडी ग्रहशांती, थोडी खडेबाबांची कृपा असे सारे चारीबाजूने प्रयत्न केले की नोकरी लागायची थांबते होय? प्रयत्नांती परमेश्वर म्हणतात, साध्या नोकरीचे काय? तेवढी शेवटची डिग्री परीक्षा पास झाला असता तर सोपे झाले असते. पण काही हरकत नाही. त्यावर ही तोडगा आहेच. आम्ही पाहिलेय, या वर्षात 'ङ' नावापासून सुरू होणाऱ्या कंपनीतून थेट कॉल येईल त्याला. उपास नि उपासना सुरू ठेवा म्हणजे झालं..

मानकर बाई:

होय गुरूजी. श्रद्धा असली की दगड ही पाण्यावर तरंगतात. मन्याला नोकरी लागेलच.

शिवदे:

आणि साहेबांच्या प्रकृतीची काळजी घ्या येत्या दोन महिनाभर. थोडे मंत्र देतो, रोज म्हणा. तुम्ही गुरूवारचा उपवास धरा, त्यांच्या नावाने. त्यांना सांगा अगदीच काही लागलं इमर्जन्सी तर डॉक्टरकडेही जा. फक्त काही कमीजास्त लागले तर मला विचारल्याविना पुढे जाऊ नका..

मानकर बाई:

बाई बाई, फारच मोठं आजारीपण संभवते की काय?

शिवदे:

तसंच नाही काही. पण दिवसमान खराब आहेत. अशांत ग्रहांमुळे वर्तमान अस्वस्थ होण्याची शक्यता आहे. तेव्हा काळजी घेणे आले. थोडेफार वैद्यकीय उपचार करा पण त्याच्या आहारी जाऊ नका.

मानकर बाई:

नाही गुरूजी. मागच्या वेळेस मन्या तापाने फणफणला तो खडे बाबांच्या अंगाऱ्यानेच खडखडीत बरा झाला. औषधे वगैरे नुसती अंधश्रद्धा गुरूजी. त्या फंदात पडतच नाही मी.. पण ह्यांची तब्येत जास्तच बिघडायची नाही ना? डायबिटिस तसा कंट्रोलमध्ये नाही. पण येईल. खडेबाबांनी पुड्या दिल्यात. त्या बाकी औषधांत दम नसतो.. पैसे लुबाडतात उगाच.

गुरूजी:

तुम्ही चिंता सोडा वहिनी. मी आहे. मी पाठीशी आहे भक्कम. नंतर एकदा नवग्रह शांति करून टाकू.. थोडा खर्च होईल फार पण एकदा का केली की संपूर्ण कुटुंबाचा एकसाथ विमा उतरवल्यासारखं होईल. वारंवार पूजाअर्चा करायला नकोत..

मानकर बाई:

तुम्ही म्हणाल तेव्हा गुरूजी. खर्चाचं काय? गरज वाटलं तर कर्जाऊ घेऊ. कुटुंब स्वास्थ्यापुढे पैशाची काय पत्रास? पण आज आलेय ते माझ्या सुलू साठी..

गुरूजी:

सुलू म्हणजे? मोठी?

मानकर बाई:

हो गुरूजी. लग्नाची झालीय. हुशार आहे. कॉलेज संपलं आताच. नोकरी करेन म्हणते. म्हटलं पोरीची जात. कुठे कुठे भटकायची, रस्ता नको चुकायला. उजवून टाकली की बरं.. जिवाचा घोर मिटेल..

गुरूजी:

तिचं जन्मटिपण आणलंत?

बाई पिशवीतून काढून देतात.

मानकर बाई:

हे घ्या गुरूजी.

गुरूजी भिंगातून पाहत वाचायला लागतात..

गुरूजी:

विद्या.. मानकर.. मग सुलू कोण?

मानकर बाई:

अगं बाई, तिचं खरं नाव विद्या आहे गुरूजी.. घरी सारे सुलू म्हणतात..

गुरूजी:

असू देत.. पोरगी भाग्याची असणार.. गुरवारचा जन्म दिसतोय..

मानकर बाई:

तुमचा आशीर्वाद असू देत गुरूजी..

शिवदे:

तो तर आहेच. नाहीतर आजकाल देवालाही भक्त कुठे मिळतात. अहो, एका वेळी दोन तीन देवांना नवस बोलतात. जो पावेल असं वाटेल त्यावर श्रद्धा. बरं.. बघून सांगतो जरा कुंडली..

डोळ्यासमोर कागद धरत, कधी भिंगातून पाहात. आकडेमोड करतात. समोर बाई हात जोडून बसलेल्या. पाठून रियालिटी शो मध्ये रिझल्ट जाहीर करण्याआधी येतं तसं सस्पेन्स वाले संगीत वाजतेय.. थोड्यावेळाने गुरूजी बोलायला लागतात ..

गुरूजी:

अभिनंदन वहिनी. पत्रिका चांगलीय. लग्नयोग जोरदार आहे. यंदा कर्तव्य आहे असे बोर्ड लावायला घ्या.. मुलगा चांगलाच असेल.. येथे वक्री जाण्यासाठी कुठल्या ग्रहाला चान्सच नाही.

सरळसोट सारे..

मानकर बाई:

बरं झालं बाई.. कृपा तुमची. एक घोर मिटला. निघते मी गुरूजी.. येते..

गुरूजी काही बोलणार तोच अजय घरात शिरतो..

गुरूजी:

आलात साहेब.. वहिनी, हा मुलगा माझा..

अजय:

नमस्कार..

मानकर बाई:

नमस्कार.. निघते मी..

*बाई जातात. पाठी शिवदे गुरूजी बसलेत आकडेमोड करत, अंधुक प्रकाशात त्यांची आकृती दिसतेय. प्रकाश फक्त अजयवर..*

अजय: (स्वगत)

हे आमचे तीर्थरूप!

ज्योतिषाचार्य!

आचार्य राजाराम गंगोजी शिवदे.

हा व्यवसाय कित्येक वर्षांपासूनचा त्यांचा..

आणि मी हा असा!

भांड्यास भांडं लागायला कारणंच कारणं आहेत इकडे!

त्यांना मी वाया गेलेला वाटतो!

कारण फिजिक्सचा विद्यार्थी मी!

त्यांना ज्योतिषशास्त्र सोडून दुसरी शास्त्रंच अमान्य आहेत! तरी बरं त्यांच्या ग्रह गोल ताऱ्यांचे नियम भौतिकशास्त्रानेच दिलेत. खगोलशास्त्राने ग्रहगोलांची वर्णने दिलीएत..

त्यांना वाटतं हा धंदा मी पुढे चालवावा!

धंदा!

मला तरी तसंच वाटतं! म्हणजे पुढे चालवणं नव्हे!

तर हा धंदा आहे!

स्वप्न विकण्याचा!

कॉलेजात एकदा प्रोफेसर भार्गवांचं लेक्चर ऐकलं.. लहानपणापासून वाटायचं या शकुन अपशकुनात अर्थ नाही, या अंधश्रद्धा निरर्थक नि घातक आहेत..

लोकं काय काय करत नाहीत? पोटदुखीचा इलाज काय ज्योतिषी करतो? पण नाही! ऑप्रेशन करायचे की नाही हे बाबांच्या सल्ल्याने ठरवरणार! बाबा डॉक्टर आहेत?

आणि हे आचार्य ही ठोकताळे लावत शास्त्रास टाळे ठोकत देतात सल्ले!

प्युअर सायन्सचा स्टुडन्ट मी!

विचार करून गरगरतं डोकं.

भार्गवसर म्हणालेले, प्रश्न विचारणं हे जिवंतपणाचं लक्षण आहे.

नि गतानुगतिकता प्रश्न विचारण्यासच उद्धटपणा मानायला भाग पाडते!

ह्यांचं म्हणणं एकच! गप्प बसा!

पिन ड्रॉप सायलन्स!

पण ऐकलं कितीही तरी मनास नाही पटत.

आय थिंक देअरफोर आय ॲम!

मनुष्य हा थिंकिंग ॲनिमल आहे म्हणून तो सृष्टीवर नियंत्रण ठेवतोय! आणि अर्थातच तिचा अविचाराने विनाश ही करतोय!

पण बिनसतंय सगळं इथे, आम्ही विचार करण्याचा वसा घेतलेला.

मग आम्हाला सर्वांमागचा हवा कार्यकारण भाव! आणि आमच्या तीर्थरूपांस विचारले तर अहो रूपम अहो ध्वनी.. उद्धार करतील आमचा! आमचा म्हणजे मी आणि माझे काही मित्र.. समविचारी .. नव्हे सम अविचारी .. विजय वगैरे.

आम्हांला प्रश्न पडणं सुटत नाही

नि यांना प्रश्न विचारलेले चालत नाहीत!

म्हणजे चालतात, पण 'कां' नि 'कसे' ते विचारून चालायचे नाही!

प्रश्न विचारा ज्यात असले काही नसेल.

मग ते म्हणतील ते ऐका.. मान डोलवा..

जणू ते गारूडी नि आपण साप.. निर्दात.. बिनदाताचे!

पुंगी पुढे डोलावे फक्त नि हे म्हणणार, हेच स्वत: पोक्त!

कॉलेजात गेल्यापासून हे प्रश्न पडणे फार वाढलेय.

का नि कसे?

कार्यकारण भाव नि त्याचा अभाव..

किंवा त्याचा प्रभाव!

पण बाबांचा तो नाही स्वभाव!

ते म्हणतील उद्धटा, चले जाव!

मग काय करणार? बंद करावी लागते आपली काव काव!

उगाच का गमजा.. बढाया माराव्यात.. करीन मी यँव नि त्यांव!

इकडे फक्त बाबा वाक्यं प्रमाणं!

ते म्हणतील ती पूर्व दिशा..

नि ते म्हणतात, त्यांना माहितीय ती पोथ्या पुराणात सांगितलेलीच म्हणजे म्हणे पूर्व दिशा!

मग होईना का आपली दशा!

पण माझं काय झालंय त्रांगडं ना..

श्रद्धा कुणावर ठेववत नाही..

नि अंधश्रद्धा कुठे पाहवत नाही.

नि यांच्यासमोर बोलवत नाही!

अशा गुंत्यात अडकलोय एखाद्या कोळ्याच्या जाळ्यात अडकावा तसा.

यातून सुटावे कसे बाहेर?

की सुटूच नये?

खरंच यात अडकणं किती सोपं नि सुखकर आहे! उगाच कोणाशी वाद नको, विवाद नको!

आलाच कुणी बुद्धीवादी तर त्याला हुं.. स्वत:स अतिशहाणा समजतोस म्हणून हिणवावे!

अगदीच खनपटीस बसला तर आमच्या उज्ज्वल परंपरांबद्दल पाखंडीपणे वाद घालतो म्हणून त्यास गप्प करावे!

आमच्या निष्ठा आर नॉन निगोशिएबल म्हणून त्याचे तोंड बंद करावे.. अगदीच नाठाळ असेल तर बंद करावे आपले कान!

उगाच असल्या पाखंडाने कान विटाळू देऊ नयेत..

बहुसंख्यांस जे वाटते नि पटते तेच खरे!

तीच लोकशाही!

मग भोगा शिक्षा लेकाच्यांनो..

सॉक्रेटिस नि गॅलिलिओ पासून आमचे आधुनिक सुधारक ..

उगाच दात विचकून प्रश्न विचारून श्रद्धांवर प्रश्न उपस्थित करणाऱ्यांनो..

शतकानुशतके मिळणाऱ्या शिक्षेने डोळे उघडत नाहीत की काय?

बापरे! काय बोलतोय मी?

नि ते आजच का?

कारण दिसतेय मला माझंच भविष्य!

कलहाची नांदी!

यस्स! गृहकलह!

अर्थात कां की चि.सौ.कां. विद्येशी विवाह!

कां?

कारण प्रेमविवाह तो..

प्रथा नि परंपरेचे पाईक!

कसे होऊ देतील?

असो.

इतुके चिंतन बख्खळ झाले!

प्रत्यक्ष रणांगणात उतरताना हात चालो तुझा पार्था.. म्हणजे होतील विचार सार्था!

कळलं की नाही?

आपल्याच लोकांबरोबर विचारांचा लढा!

पण 'ते' म्हणतील त्यांनी कित्येक पावसाळे जास्त पाहिलेत! त्यावर आपल्याला निरूत्तर होण्यावाचून पर्यायच नाही!

की आहे?

आहे अशी एखादी मुख्यमंत्री एकसाथ तीन पावसाळे योजना वगैरे?

एका वर्षात तीन पावसाळे पाहून होतील अशी काही सोय?

विद्या म्हणते ते बरोबर आहे, कितीही, काहीही, कुठेही बोलत सुटतो मी!

आता गप्प बसावे खरे!

तुका म्हणे उगी रहावे!

जे जे होईल ते ते पहावे!

५.

स्थळ: विजयचे घर

विजय:

काय मग? नवल विशेष?

अजय:

नवल हेच.. विशेष काही नाही! नाही.. विशेष हेच की नवलच नवल आहे रे!

विजय:

म्हणजे शेष सारे नवलच आहे.. विशेषच नवल दिसतंय!

अजय:

अरे, काय सांगू? हमारे लव्हस्टोरी की होनेवाली चित्तरकथा!

विजय:

का? काय झालं? विद्या विनये न शोभते.. पण तू तर विनय नाहीस!

अजय:

वा! पाजळले अकलेचे दिवे? मिणमिणता झीरो लँप पण याहून जास्त उजेड पाडेल रे हीरो! अरे, काय सांगू? आमचे पिताश्री..

विजय:

प्रत्यक्ष ज्योतिषाचार्य शिवदे गुरूजी?

अजय:

येस्स! त्यांचा धंदा जोरात सुरू आहे. अरे नवग्रहांना आग्रह करून ते कुंडलीतली जागा बदलायला लावतात.. तुम्ही खूप काम करता.. पण हवे तसे फळ मिळत नाही! तुमचे मन साफ आहे.. पण लोक गैरसमज करून घेतात.. वगैरे वगैरे सांगून गिऱ्हायकांना असे गुंडाळतात.. अरे, कॉमन सेन्स नि माणसाची सायकॉलॉजी ही! मी तुला तू खूप चांगल्या मनाचा आहेस म्हणालो तर तू कशाला घेशील ऑब्जेक्शन? नाही म्हणजे तसा तू नाहीस हे मला ठाऊक आहे तरी..

विजय:

मारो, आड आडके बाण मारो.. विद्याला मार नैनोंके तीर नि मला टोमणोंके बाण! पण आय गेट युवर पॉईंट! कित्येकदा ते भूतकाळच जास्त सांगतात..

अजय:

पण प्रश्न तो नाही रे! अरे, आजवर कोणीच आला नाही त्यांना विचारायला की तुम्ही वर्तवलेलं काहीच खरं ठरलं नाही म्हणून. पण ते राहू देत.. आमच्या लव्हस्टोरीतल्या ट्विस्टाचा मार्ग पूज्य पिताजी नि विद्याच्या माताश्री यांच्यातून जातो!

विजय:

म्हणजे? म्हणजे आता सांगू नकोस.. पॉज ऑफ टायगर अर्थात वाघाचे पंजे!

अजय:

अरे, झालीय गुंतागुंत अशी.. विद्याची आई काल घरी आलेली..

विजय:

वा! डायरेक्ट मागणी?

अजय:

चुप रे. तिने विद्याची पत्रिका दिलीय बाबांकडे. लग्न ठरवण्याबद्दल सल्ला!

विजय:

मग चांगलंय की! एक कदम विद्या की ओर! पण तुला कळलं कसं? की तुम्हारे आदमी चारों ओर फैले हुए हैं आणि भिंतीको कान होते हैं?

अजय:

अरे, मी पत्रिका पाहिली.. बाबांसमोर होती. नाव होतं त्यावर.. विद्या मानकर! आता म्हणशील एकाच नावाच्या कितीतरी व्यक्ती असू शकतात.. पण मी नाव गाव वजन पत्ता सारं पाहिलंय.. म्हणजे विद्याची आई..

विजय:

सो टू से.. युवर सॉस नव्हे सॉँस.. नहीं सास!

अजय:

म्हणजे विद्या सांगते ते खरं..

विद्या आत शिरते.

विद्या:

आले एकदाची!

अजय:

बघ, आज मी उशीर नाही केलाय!

विजय:

तुम्ही उशीर करण्याचे दिवस वाटून घेता काय? प्यार का वादा.. फिफ्टी फिफ्टी! येऊ उशीरा.. फिफ्टी फिफ्टी!

विद्या:

तुझ्या विश्रब्ध शारदेस सांगून बघ..

विजय:

प्रक्षुब्ध शारदेस? ती 'नाही मी बोलत नाथा' म्हणते फक्त!

विद्या:

नाथा म्हणते ना?

अजय:

मग कशाला पिटतोयस माथा? अरे ती तुला पाहून डंब फाउंडेड होत असेल!

विजय:

हुं.. इतका तुला मी डंब वाटतो?

विद्या:

अरे, त्याहून एक मोठी बातमी आहे..

विजय:

काय? पिताजीने तुम्हारी शादी दूसरी जगह तय कर दी है? आणि अजयने तुला पळवून न्यावे?

विद्या:

तुझ्या जिभेस काही हाड?

अजय:

अरे हाड! हा बिघडलाय.. बस झाले याचे लाड..

विद्या:

मी आजवर कधी लक्ष दिलं नव्हतं. आजच आई म्हणाली, शिवदे गुरूजींनी सांगितलंय काहीतरी! मला वाटतं अजयचे बाबाच आहेत ते.. आमचे फॅमिली ज्योतिषी!

अजय:

अगं इतकंच नाही! तू कुंडलीरूपात येऊन पोहोचली आहेस आमच्या घरी! मी स्वत: पाहिलंय!

विजय:

म्हणजे.. कुंडलिनी जागृत झाली की काय? द ग्रेट अवेकनिंग ऑफ विद्यादेवीज कुंडलिनी! म्हणजे निद्रिस्त होती आधी?

विद्या:

तुला अजयचा गुण लागलाय! कुछ भी बोलते रहो! पण आई खुश झालीय.. (लाजत) विवाहयोग लवकरच आहे म्हणून सांगितलंय..

अजय:

कोणाचा?

विद्या:

मला नाही माहिती!

विजय:

अरे मामंजींनी सांगितलं असेल!

अजय:

मामंजी! अरे, इतकं सोपं असतं तर ना! जोवर त्यांना माहिती होत नाही तोवरच.. एकदा माझेच हे विद्या प्रकरण कळलं की हंडाभर हुंड्यासाठी तळमळ सुरू

होईल.. रूढी आहे ती. घबाड मिळायचं असेल तर लबाड काम करायला मागे पुढे नाही पाहणार! आमची कुंडली अशी जमणंच शक्य नाही! शेवटी जमवणं न जमवणं त्यांच्याच तर हाती आहे! कुठे शनिचा कोप नाहीतर कुठे मंगळ दाखवला की घाबरणार सारे.. बघालच तुम्ही.. इस्पेशियली घरचे सारे.

विद्या:

मग पुढे काय?

अजय:

नेहमीचेच. संघर्ष हमारा नारा है!

विजय: (घोषणा देत)

जोर जुलुम की चक्कर में संघर्ष हमारा नारा है..

विद्या:

च की ट?

विजय:

च ची चषाभा चलतेबो चतू?

विद्या:

चल रे, चक्कर नव्हे टक्कर! जोर जुलुम की टक्कर ..

विजय:

एनी वे, चक्कर वा टक्कर, संघर्ष तर टळायचा नाहीच!

अजय:

आणि बदल हवा असेल तर कोणा ना कोणाला त्यासाठी काहीतरी करावेच लागतं..

विजय:

मग दुनिया की कोई भी ताकद तुम्हें जुदा नहीं कर पाएगी?

अजय:

हुं. इकडे म्हणजे मुंबईत तरी तसं होऊ शकतं. त्या जातपंचायती नि खापपंचायतीत तर कोणा एकाचा जीव घेऊन ते जुदा ही करू शकतात.. मोठ्या शहरात त्यातल्या त्यात तेवढे एक नाही. नाहीतर बुडणारी जात म्हणजे समाजास जणू लागलेली आग! मग ते बंब घेऊन ती विझवायला येतील लगेच.. मुलगा नाहीतर मुलगी कोणाला तरी बली चढवल्यावाचून यांचा जातिदेव पावत नाही म्हणे! पण आम्ही घाबरत नाहीच..

विजय:

हो ना! श्री संत गब्बरसिंग रामगढवाले खुद्द सांगून गेलेत.. जो डर गया सो मर गया!

विद्या:

अरे, आमच्या घरी तर अजून कठीण आहे. नुसते ज्योतिष नाही, कुणीतरी खडे बाबा की कुणी आहे. खडे मारतो म्हणे फक्त!

अजय:

म्हणजे तू मला मारलेलास तसा!

विद्या:

तुला गंमत सुचतेय?

विजय:

बघ ना! इकडे टेन्शनने हिला दिवसा झोप येत नाही.. दोन जेवणांमध्ये भूक लागत नाही.. रात्रीचं घोरणं बंद पडलंय.. नळाचं पाणी पळालंय.. आय मीन तोंडचं पाणी हॅज रन अवे..

विद्या:

तू गप रे.. आमच्या घरचे ठाऊक नाहीत तुला म्हणून. आधीचे दोन बाबा बदलून झाले. आता सध्या खडे बाबा. अरे माझ्या भावाला ताप चढला तर औषध नाही देत, खडे बाबाने हातातून काढून दिलेला अंगारा लावत बसले. ताप उतरला म्हणून बरं. बाबा डायबिटीसची औषधं नाही घेत, बाबाच्या पुड्या घेतात..

विजय:

अगं त्या पुड्यांनी डायबिटिस बरा होतो अशी पुडी सोडली असेल कुणीतरी!

अजय:

कुचिपुडी डान्स ने पण होईल का?

विद्या:

तुम्हाला बरी गंमत सुचू शकते? एकदा तर त्या खडे बाबाचा खडा डोळ्यात लागता लागता बचावलेली माझी बहीण. तशी मी एक बचावले आहे. मी साफ सांगितलं मी काय बुवा नि बाबाच्या फंदात पडायची नाही..

विजय:

हिनं सांगितलं घरी बाबांना, बाबा, माझा तर बाबा एकच बाबा.. अजय बाबा!

*विद्या रागाने बघते*

विजय:

मी 'बुवा' काही नाही बोललो!

अजय:

थोडक्यात काय परिस्थिती गंभीर आहे. अशा स्थितीत काय करावे याचा गंभीर विचार करणे जरूरी आहे..

विजय:

तुमची स्थिती पाहून मला तर वाटतं, मी शारदेचा नाद सोडावा. उगीच सुखी जीव दु:खात घालू नये!

अजय:

तुला काय वाटतं? ही विद्या इथे समोर असताना मी याला अनुमोदन देईन? कितीही मनात असलं तरी? ती तर मूळ परिस्थितीहून ही अधिक बिकट अवस्था होईल!

विद्या:

असं काय? बघतेच मी..

विजय:

बापरे! माझ्याच घरात आहे मी.. निघून ही जाऊ शकत नाही.. नि इथे होणारा रक्तपात.. त्याचा चश्मदीद गवाह ही बनू शकत नाही.. रणांगण हे! वाचीव रे मला.. देवा!

अजय:

तुलाच नव्हे! या कालीमातेच्या अवतारापासून मला देखील!

विजय:

पण एकदा तुम्ही घरच्यांशी बोला की.. त्यांना मत पटवून द्या. राजकारण्यांचा आदर्श ठेवा की जरा! ते लोकं कसं नसलेले मुद्दे निर्माण करतात. पटवून देतात. मूळ मुद्द्यापासून दुर्लक्ष करायला भाग पाडतात. मग त्यांनी उपस्थित केलेला मुद्दा हाच खरा जीवनमरणाचा प्रश्न वाटायला लागतो.. तुमचा तर मुद्दा ही खरा आहे!

अजय:

बस बस! विजय महाशय किती बोलाल? तुमच्या मुखातून ज्ञानगंगा प्रकटणे म्हणजे एव्हरेस्टवर उकडण्याइतकी अशक्य गोष्ट.. पण अशक्य ते शक्य करता सायास..

विजय:

राहिलं. तुमच्या लव्हस्टोरीतला.. हितचिंतक म्हणून वितंचक.. कॅटॅलिस्ट.. होण्याचा प्रयत्न करत असताना तुम्हालाच ते नको असेल तर मला त्याचे काय? पण ध्यानात ठेवा.. शेवटी या स्वामी विजयानंदाचेच पाय धरावे लागतील..

अजय:

क्रोधित होऊ नये स्वामीजी.. पण आम्ही पालकांसमोर बोलणे हे औद्धत्याचे लक्षण मानले जाईल. आमच्या सळसळत्या तारूण्यास बोल लावले जातील. तारूण्यातील अस्वस्थपणास आततायीपणा म्हटले जाईल. जग बदलण्यास ही अस्वस्थ तरूणाईच कारणीभूत आहे ह्याकडे सोयिस्कर कानाडोळा केला जाईल. आणि आपण अधिक पावसाळे पाहिले नि छत्र्यांचा वापर अधिक केला आहे याची समज देऊन तुम्हास काय कळते म्हणत आमची तोंडे बंद केली जातील.. मूळ मुद्द्यास बगल देणे, होता होईतो पुराणमतवादास तात्विक चिंतनाचीच नव्हे तर छद्म विज्ञानाची झिलई चढवून ते सादर केले जाईल. त्यास आम्ही बधलो नाही तर आई, वडील अशा नात्यांचा भावनात्मक वापर चलाखीने केला जाईल.. स्थितीवाद कोणत्याही परिस्थितीत सोडला जाऊ दिला जाणार नाही!

विजय:

या सर्वांवर एकच इलाज.. जालीम लोशन आणि जालीम मलम!

विद्या:

तुला अजूनही गंमत सुचतेय?

विजय:

अर्थातच! विरोध असल्यावाचून लढाईतला आनंद मिळावा कसा?

विद्या:

ठीक आहे.. प्रत्यक्ष त्या शारदेस सांगते.. विरोध कर.. अशातशाने या विजयास विजयाचा आनंद मिळू देऊ नकोस!

विजय:

शारदा! नको माझ्या दुखऱ्या नसेवर हात ठेऊस.. जखमेवर देश का नमक लावूस.. उचलेल ती मीठ मूठभर, खचवेल या न घडलेल्या प्रेमकथेचा पाया..

*काही सेकंद अंधार.. मागे विजय नि अजय बोलताहेत.. विद्या पुढे होऊन बोलतेय..*

विद्या: (स्वगत)

तर हे असं आहे! त्रांगडं!

एकात एक फसलेले पाय.

नि त्यावर नाही दिसत काही उपाय.

मग आता होईल काय?

आणि आता करावे काय?

काही खरं नाही विद्या बाय!

दोघे आम्ही गोंधळलो.. नव्हे भांबावलो..

ते हिंदी सिनेमावाले म्हणतात ते खरंय, जब प्यार करे कोई.. तो नहीं देखता जात धरम!

म्हणजे हे ही आमचेच करम!

तरी बरं ही परधर्मी लव्हस्टोरी नाही!

नाहीतर त्या विरोधात आईबापच नव्हे, तर सारा समाजही एकवटला असता!

अजय म्हणतो ते खरे..

देव दानवा नरेचि निर्मिले..

आणि हा जातिप्रजातींचा बागुलबुवा..

तो ही माणसाचीच कल्पक निर्मिती!

उच्चनीच नि सामाजिक उतरंड!

अशी की खालच्या पायरीवरच्याने म्हणायलाच हवे, थोडी सी तो लिफ्ट करा दे!

नि मग जुन्या पुराण्या रीती रूढी नि परंपरा..

जणू काळ्या दगडावरची रेघ!

माझा अजय म्हणतो ते खरंय, घबाड मिळवायला लोक लबाड बनतील..

आणि त्यांना परंपरेच्या सबबीचा अगदी चांदीसोन्याचा वर्ख चढवतील!

त्या पाण्याने तळपणाऱ्या आपापल्या म्यानातील तलवारीने बदलू पाहणाऱ्या कोणास ही लीलया कापून काढतील.

ते पहायला सारी रूढीप्रिय जनता मागे उभी राहून टाळ्या पिटेल..

ह्या सर्वात माझ्या प्रेमकथेचं काय?

अजय म्हणतो तसा शनि का मंगळ अमंगळपणे घुसवला तर माझ्या घरी हलकल्लोळ..

आणि फुकटात आपला उच्चशिक्षित मुलगा विकायला अजयचे ज्योतिषाचार्य वडील बरे कबुलतील?

नोकरी लागलेला उच्चशिक्षित मुलगा म्हणजे कोरा चेक!

तो वटवल्याशिवाय बरे राहतील?

काय करावे?

चिंतेच्या धगधगत्या चितेवर बसल्यासारखे वाटते..

रात्र रात्र झोप लागत नाही..

आणि हा अजय मात्र ढाराढूर!

कुंभकर्ण!

आता पुढे काय?

अजय म्हणेल..

काय नाय! नाकात दोन पाय!

६.

स्थळ : अजय चे घर, दिवाणखाना

शिवदे गुरूजी आणि मानकर बाई समोरासमोर बसले आहेत..

विजय स्टेजवर बाजूला उभा आहे. सूत्रधारासारखा बोलतो आहे. प्रकाश फक्त विजयवर..

विजय:

तर आहे हे आतापर्यंत असे आहे!

अजय आणि विद्या.. दोघांना 'जब प्यार करे कोई तो देखे केवल धन' माहिती नसावे! पण दुरून बघणाऱ्यास दिसते.. जसे मला दिसतेय!

घबाड मिळण्यासाठी लबाड वागावे लागते!

हुंड्याचा हंडा हवा तर रूढींना घट्ट पकडावे लागते! आपली तीच मुळे आहेत म्हणत, त्यामुळे धर्माज्ञेचे पालन ही होईल.

धर्मरक्षणासाठी इतके करावेच लागते!

मग जातपात बघायलाच हवी.

श्रद्धेच्या नावाखाली अंधश्रद्धा जोपासण्याइतका बनचुकेपणा अंगात रूजवता आला की कर्मठता नि कट्टर धार्मिकता अंगात बाणवली गेली समजून त्या त्या माणसांच्या धार्मिकतेचा सत्कार व्हायलाच हवा!

त्या अनुषंगाने मग इतरही अंधश्रद्धांचे पीक वारेमाप घेता येईल..

समाजपुरूष यांवरच तर पोसला जातो!

तो धष्टपुष्ट व्हावा तर स्थितीशील असा नि त्या भरात पुराणातील वांग्यांचं मनोभावे भरीत करणारा समाजच हवा!

देवदयेने तो मुबलक आहे म्हणून तर ह्या महाराष्ट्र देशाचे पाऊल.. जिथे कुठे असेल तिथे..पडते आहे!

पण मुद्दा तो नाही. या अजयिद्या चे काय होणार हा आहे.. अजय अधिक विद्या बरोबर अजयिद्या! हे नवीन समीकरण कसे जुळून यावे हा आहे! इकडे अजयच्या बाबांनी कुंडलीत खडाष्टकाचा योग जुळवून आणलाय.. तिकडे विद्याची आई चिंतेत आहे..

आता शक्यता काय आहेत?

पहिली शक्यता..

हा आमचा हिंदी सिनेमा.. तिकडे शेवटी सारं गोड होतं. आणि शेवट गोड ते सारंच गोड! अगदी श्रीखंडाबरोबर पुरणपोळी खावी तसं!

*प्रकाश मुख्य स्टेजवर*

शिवदे गुरूजी:

पोरं अडून बसलीत मानकर बाई.. काय करावे? अगदी खडाष्टक आहे हो! पण पोरांना कसलं काय त्याचं!

मानकर बाई:

काय की बाई. आमच्या वेळी नव्हती थेरं! ह्याला माळ घाल म्हटलं की घालायची. मान वर करायची सोय नव्हती, म्हणून मानकरांना माळ घातली, मानकरांनीही घालून घेतली मान वाकवून! उंच ना माझ्यापेक्षा! पण जमाना बदललाय..

शिवदे गुरूजी:

बदललाय खरा.. पोरं ऐकायची नाहीत..

अजय आणि विद्या आत शिरतात..

शिवदे गुरूजी:

या! साहेब आले!

अजय:

आलो. सोबत भावी सुनेस घेऊन! भावी आहे, मानभावी नाही! (मानकर बाईंकडे पाहात) बरं झालं! सासूबाई ही समोरच आहेत.. विद्या, एका दगडात दोन पक्षी! म्हणजे किमानपक्षी आपले निम्मे श्रम वाचले..

विद्या:

हो ना!

मानकर बाई:

वर तोंड करून बोलतेस..

अजय:

बाबा आणि सासूमां..

मानकर बाई:

खबरदार मला सासू मां म्हणालास तर..

शिवदे गुरूजी:

पण मला बाबा म्हणायला तर हरकत नाही ना? बोल.. बोलूनच टाक.. बाबा..

अजय:

बाबा!

शिवदे गुरूजी:

हा काय डबा ऐसपैसचा खेळ आहे? तुला काय सांगायचंय ते सांगून टाक!

अजय:

ओह! बघितलंस विद्या, मी म्हणालेलो, बाबा माझं ऐकतील!

शिवदे गुरूजी:

ऐकतील? नुसतं ऐकून घेतील! उगाच सुतावरून स्वर्ग गाठू नकोस!

मानकर बाई:

शिवदे सुता!

अजय:

जी सासू मां.. नाही, जी सासू!

*मानकर बाई रागाने बघतात.*

अजय:

तुमचं ऑब्जेक्शन काय आहे? सासू म्हणायला की अजून काही? सासूमां?

मानकर बाई:

सासूमां? मान न मान मैं मानकर का मेहमान..

अजय:

वा! मानकर सासूबाई!

शिवदे गुरूजी:

याचं एकदा ऐकून तर घेऊ.. बाई, उगाच बुवा तुम्ही बाऊ करू नका..

मानकर बाई:

तुम्हीच म्हणता आहात तर ऐकूयात..

अजय:

तेच म्हणत होतो मी. दोघंही इथे आहात तर एकाच वेळी दोघांना सांगून होईल!

विद्या:

हो ना! दुधाचे दूध नि चहाचा चहा आता करूनच टाकू!

मानकर बाई:

बाई बाई! सुलू, तुला म्हण ही नीट म्हणता येत नाही.. नि प्रेमात पडायला बरं जमतं..

अजय:

सासूबाई.. जब प्यार करे कोई तो देखे केवल मन! असं म्हणतात.. 'बोले बरोबर म्हण' असं नाही! मी म्हणतो, म्हणीचा नि प्रेमाचा संबंध म्हणून असा काय आहे म्हणता तुम्ही?

विद्या:

आई, तुला वचन देते, यापुढे रोज दहा म्हणी नि वाक्प्रचार म्हणत जाईन परवचा म्हटल्यासारखा!

शिवदे गुरूजी:

मूळ मुद्दयावर यावे अजयसाहेब..

अजय:

तर, मुद्दा असा, जब प्यार करे कोई तो देखे केवल मन!

मानकर बाई:,

ते झालंय सांगून. पुढे!

अजय:

तर इथे ग्रह, गोल, तारे, रूढी, परंपरा, जात, धर्म, उच-नीच सारे दुय्यम.. त्या आकाशातील अब्जावधी मैलावर असलेल्या ग्रह नि ताऱ्यांसाठी ही पृथ्वी म्हणजे अब्जावधि आकाशगंगांतील एक छोटासा ग्रह! त्यातील एका कुण्या पृथ्वीवर, एका खंडातील, एका देशातील, एका शहरातील, एका इमारतीतील एका घरात राहणाऱ्या कुण्या एकाचा दुसऱ्या घरातील कुणा एकीबरोबर विवाह झाला म्हणून ते ग्रह लगेच टपून बसलेत.. इकडे वाजवा रे वाजवा झालं की लगोलग उचला कोणाला तरी पृथ्वीवरून.. मग तो किंवा ती मृत्यू पावणार! का? निव्वळ विवाह संस्काराने? इथे चोरी केली तर चालेल, शिरजोरी चालेल, पण प्रेम केलेलं नाही चालणार! त्याची शिक्षा ते आकाशातले शनि, मंगळ वगैरे अवकाशस्थ ग्रह मित्र मंडळ फर्मावणार! इतक्या दुरून हे सारे नियंत्रित करणार एखाद्या जात नाहीतर खाप पंचायतीसारखे.. आणि विरोधाभास असा की आपण म्हणणार तरीही, जन्म नि मृत्यू ठरलेला असतो. माणसांचं प्रारब्ध निश्चित असतं! ते बदलताच येत नसेल तर शनि त्यावर कुरघोडी कसा करतोय? नि हिंदी

सिनेमातल्या व्हिलन सारखा कसा वागू शकतोय? आणि प्रेमासाठी शिक्षा काय? देहान्त प्रायश्चित्त? ती शिक्षा बाकी गुन्ह्यांसाठी आपलं पृथ्वीवरील मानव निर्मित कोर्ट ठरवणार.. नि न केलेल्या गुन्ह्यासाठी शनिदेव आपली कडी गरागरा सुदर्शन चक्रासारखी फिरवत येणार नि 'उचला रे त्याला' म्हणत गब्बरसिंगासारखे वागणार! तेही आपले सारे कपाळावर नोंदलेले नशीब वगैरे इनव्हॅलिड ठरवत! अगदी ओव्हरराईड द सटवाई?

मानकर बाई:

बाई बाई.. हद्द झाली.. पाखंडीपणाची हद्द झाली..

अजय:

यात पाखंडीपणा कुठून आला सासूमां.. सासूबाई.. उलट धार्मिकता आहे ही! संचित, नशीब, प्रारब्ध वगैरे नॉन निगोशिएबल बाबींवरचा अतूट विश्वास आहे हा! तिथे उगाच ग्रहगोलांची लुडबूड कशाला? पराधीन असलेल्या माणसाने उगाच आपले दैव बदलण्यासाठी का माघार घ्यावी? लग्नापासून पळ काढावा? कां तर कोणा एकाचा मृत्यू होईल म्हणून? आणि मग पळून जाऊन आपल्याच लिहिलेल्या ललाटरेखेवरच्या भविष्यास वाकुल्या दाखवाव्यात?

विद्या:

खरंय ते!

मानकर बाई:

तू तर बोलूच नकोस! विद्या विद्यार्जनानंतर इतकी बिघडेलसे वाटलं नव्हते..

अजय:

नाही सासूबाई. हा ज्ञानदीपाचा प्रकाश आहे! अज्ञानाचा अंध:कार दूर करणारा विवेकी विचार! किंवा साध्या भाषेत तर्कसंगत विचार!

मानकर बाई:

विचार! मला विचारशील तर विचार करणंच बंद करण्याचा विचार व्हायला हवा..

अजय:

होय सासूबाई! सगळ्या प्रस्थापित व्यवस्था आणि बहुतेक सरकारांस तेच हवंय! विचार न करणारा नि झापड बांधून वागणारा समाज.. पण त्यातील विरोधाभास नि तर्क विसंगती थोडासा विचार केला तरी दिसणार नाहीत? तर्कदुष्ट समाज विवेकी कसा होणार?

शिवदे गुरूजी:

बस बस पोरा! तुमने तो मेरी आँखे खोल दी.. या जुन्या खोडांना बदलावं म्हणून तुम्ही पोरांनीच पुढे यायला हवे..

मानकर बाई:

तुम्ही पण असे म्हणता?

शिवदे गुरूजी:

हो बाई! आपण एकमेकांचे संबंधी व्हावं हेच लिहिलं असेल तर तिकडे ललाटावर तर त्यास बदलण्याचा प्रयत्न का करावा?

मानकर बाई:

बघा बुवा.. तुम्हाला पटत असेल तर..

अजय:

तो ये रिश्ता मैं पक्का समझूं?

शिवदे गुरूजी:

पण आमची एक अट आहे..

विद्या:

बोलावे मामंजी..

शिवदे गुरूजी:

या प्रसंगी कॅडबरी वाटून मुंह मीठा किया जाय!

मानकर बाई:

बाई बाई! फारच बुवा वरपक्षाच्या अपेक्षा!

विद्या चा◌ॅकलेट सर्वांना देते.. अजय व ती, दोघं गुरूजी नि बाईंच्या पाया पडतात.. पाठून सनईचे सूर..

प्रकाश परत फक्त विजय वर..

विजय:

पाहिलंत! प्रा◌ॅब्लेम सॉल्व्हड! हिंदी सिनेमात हृदय परिवर्तन कपडे बदलावं तसं होतं! उगाच आपल्याच मताला ठामपणे चिकटून बसण्याचा आडमुठेपणा तिकडे होत नाही! ओपन माइंडेड सारे.. चट मंगनी पट ब्याह.. तसा चट विचार पट क्लायमॅक्स! तिकडे शेवटाला पोलिस तरी येतात नाहीतर एकशे ऐंशी अंशाने विचार परिवर्तन तरी होते!

पण हा सिनेमा नाही.. हिंदी तर नाहीच नाही! मग काय होऊ शकते..?

हे चित्र पहा..

प्रकाश परत मुख्य स्टेजवर

मानकर बाई :

काय करावं गुरूजी? पोर अडून बसलीय..

शिवदे गुरूजी:

अनिष्ट ग्रहमान.. घोर लावणार पोर जिवास.

मानकर बाई:

पण यावर उपाय? तुम्हीच सांगा गुरूजी? पोरं या थरास जातीलसे वाटलं नव्हते. तरी मी सांगत होते, पोरींना शिकवू नका. शिंगं फुटतील. पूर्वी मुलींना शिक्षण नव्हते तेच बरे होते. अधर्माचरण तर होत नव्हते.. कामापुरता लिहिता वाचता आले बसं झालं. माझी कुमी बघा. दहावी झाली. आता घरी बसलीय. शिवणकाम करेन म्हणते. कशाला हवीत कॉलेजं बिलेजं.. उगाच शिक्षणाचं स्तोम..

शिवदे गुरूजी:

तुमचा राग समजू शकतो बाई. पण प्रश्न फक्त रूढी मोडण्याचा नाही. खडाष्टकाचा आहे. कुणा जिवाचं बरं वाईट झालं तर कोणाच्या तोंडाकडे पाहावे? आणि आम्ही म्हणतो ती म्हणजे काळ्या दगडावरची रेघ!

मानकर बाई:

खरंय बाई! काळ्या दगडावरची पिवळी रेघ!

आधी पांढरी रेघ म्हणायचे.. पण काळानुसार बदलायला नको? काळ्या दगडावरची पिवळी रेघ! तिला न पडेल भेग! काही करा पण हे अधर्माचरण टाळा.. नाव विद्या.. हिला अशी अविद्या व्हावी..

*अजय आणि विद्या आत येतात..*

मानकर बाई:

आलीस विद्या? अगं अशी थेरं करायला कॉलेजात गेलीस? गेलेली अब्रू परत येत नाही.. त्यात तरण्या पोरीची अब्रू म्हणजे टिच गेलेल्या अंड्यासारखी. परत नाही सांधता येत..

विद्या:

पण ती काचेच्या भांड्यासारखी होती ना?

मानकर बाई:

सुले, ती गोष्ट जुनी. काळ बदलला.. आपण ही बदलावे.. टोपभर काचेची भांडी काय की टीचभर अंडे  काय.. टिचले की सांधता येत नाही!

अजय:

असं म्हणता सासूमां..?

शिवदे गुरूजी:

तुम्ही.. अजय साहेब.. आपल्या अकलेच्या दिव्यांचा दिव्य उजेड पाडायला निघालेले दिवटे चिरंजीव..

मानकर बाई:

आणि सासूमां काय?

अजय:

राहिलं.. सासू बाई म्हणू? की प्लेन व्हॅनिला.. सा सू?

मानकर बाई:

गुरूजी.. तुमचा मुलगा हाताबाहेर गेलाय.

शिवदे गुरूजी:

आणि ही तुमची विद्या पण काही कमी नाही.. ती हाताच्या आत आहे म्हणता का तुम्ही?

मानकर बाई:

तसं नाही गुरूजी.. दोघंही हाताबाहेरच गेलीत..

शिवदे गुरूजी:

तर बालकांनो, अजय पित्याचा नि विद्यामातेचा आदेश आहे.. यापुढे हे सारे विसरून जावे..

अजय:

म्हणजे? चलो एक बार फिरसे अजनबी बन जाए हम दोनों?

विद्या:

हे कसं शक्य आहे? काचेचं भांडं तडा जाऊन फुटत असेल पण आपली कथा टाटा स्टीलची आहे. अंबुजा सिमेंटची आहे. फेव्हिकॉलका जोड है! आपली कथा.. न फुटेल न तिला टोचा पडेल.. हिऱ्यासारखी ती सदा के लिए आहे.. नुकत्याच उमललेल्या फुलासारखी टवटवीत आहे..

अजय:

वा! परिकथेसारखी मनोरम..

विद्या:

पापडा सारखी कुर्रम कुर्रम..

मानकर बाई:

घरी चल.. नाही पापड मोडला ना तर..

शिवदे गुरूजी:

हे बघा, कुंडलीतील अनिष्ट ग्रह ही हसण्यावारी नेण्याची गोष्ट नाही..

अजय:

ग्रहांबद्दल हा असा पूर्वग्रह कशाला बाबा? ग्रह गोलांना हे एवढेच काम आहे? अब्जावधी मैल दूर असणाऱ्या पृथ्वीवरच्या यकश्चित शहरातील दोन यकश्चित कोणी प्रेमबंधनात अडकले तर यांचा पापड मोडला जावा?

शिवदे गुरूजी:

ज्या बाबतीत आपल्याला कळत नाही त्याबद्दल बोलू नये.. प्रकांड पंडितासमोर भौतिक शास्त्राचे मुळातच चुकीचे असलेले ज्ञान पाजळू नये. खऱ्या शास्त्रापुढे

ते छद्म विज्ञानीय सिद्धांताचे स्तोम माजवणारे तुमच्यासारखे आपल्या प्राचीन संस्कृतीची किती हानी करतात याचा अंदाज नाही तुम्हाला.. कुंडलीतील ग्रहांचे म्हणणे असे की हे लग्न झाल्यास कुणाचा तरी मृत्यू अटळ आहे.. तेव्हा प्राण गेला तरी ही या विवाहास शास्त्र संमती नाही!

अजय:

म्हणजे? एवीतेवी प्राण जाणारच आहे! तो विवाहोत्तर जावा..

विद्या:

ते गाणं आहे ना.. शादी तुम्हीसे होगी.. चाहे शादी के दिन मर जाऊं..!

मानकर बाई:

बाई बाई.. हद्द झाली.. इत:पर काही बोलू नकोस.. नाहीतर हद्दपार करावे लागेल तुम्हांला..

शिवदे गुरूजी:

खरंय मानकर बाई. इतकी उथळ विचार करणारी मुलं पाहिली नाहीत.. सुप्रीम कोर्टाचा आदेश आहे.. हे लग्न होणे नाही!

मानकर बाई:

घरी चल, चांगलं दाखवतेच! विद्याला इतकी विद्या घेऊ दिल्याचा पश्चात्ताप होतोय आता.. त्यापेक्षा माझी कुमी बरी. दहावी झाली. आता शिवण टिपण..

उगाच ते शिक्षणाचं स्तोम माजवावं कशाला.. बाईच्या जातीनं घर सांभाळावं.. आपली संस्कृती राखावी..

शिवदे गुरूजी:

किती उदात्त विचार बाई..

*प्रकाश परत फक्त विजयवर*

विजय:

शेवटी परत त्याच ठिकाणी! टफ नट टू क्रॅक! यात आता कहानी में ट्विस्ट काय असेल? एक दूजे के लिए स्टाइल? छे! मित्रय माझा, सख्खा! थोडा असेल विचित्र, निर्लज्ज, थोडे माझे पैसे बुडवलेत त्याने, पण म्हणून दोघांचा या जगास निरोप? नो! नाय! नेव्हर! आपण गेलो की मागे काय राहते? जन पळभर म्हणतील हाय हाय! ते नकोच! अगदी कल्पनेत ही नको! त्यापेक्षा

तडक ॲक्शन घेऊन फडक काही घडावे? अगदी थेट ॲक्शन! दोघांनी डायरेक्ट गळयात माळा घालून पाया पडायला यावे? मग काय? ऑल हेल लेट लूझ? बघू या!

*प्रकाश परत स्टेजवर.*

*शिवदे गुरूजी आणि मानकर बाई बसलेत. चेहरा चिंताग्रस्त. गुरूजी कुंडली घेऊन बसलेत नि बाई शुऽ शुऽ करत पदराने वारा घेत बसल्यात..*

शिवदे गुरूजी:

कोणी काही म्हणा, हा विवाह होणे नाही! ही पांढऱ्या दगडावरची काळी रेघ आहे! पर्मनंट मार्करची समजा!

मानकर बाई:

पण ते काळ्या दगडावरची रेघ म्हणतात ना?

शिवदे गुरूजी:

असतील! पण हा कालानुरूप बदल आहे! काळ बदलला.. सारे बदलले. बदलले नाही ते शास्त्र नि विज्ञान. आमच्या शास्त्राबाहेर या विश्वात काही नाही! आणि हे लग्न होणे नाही!

मानकर बाई:

पण पोरांनी न विचारताच करून टाकले तर?

शिवदे गुरूजी:

नाही बाई! हे होणे नाही. कुंडलीतील ग्रहांची स्थितीच अशी आहे की हे होणे नाही! खगोलस्थ ग्रह ताऱ्यांच्या सूक्ष्म नजरेतून सुटून वरमाला घालण्यासाठी मुलीचा हात उचलला जाणे केवळ अशक्य!

मानकर बाई:

पण मुलाचा हात? वधूमाला घालण्यास उचलला गेला तर?

शिवदे गुरूजी:

तो अर्धविवाह! तो शास्त्रसंमत नाही बाई! शास्त्राप्रमाणे आणि आमच्या प्रदीर्घ व्यासंग नि अभ्यासानुसार हा विवाह होणे नाही! त्यामुळे चिंता नसावी.

*अजय आणि विद्या गळ्यात मोठे हार घालून आत शिरतात. शिरताच गुरूजी आणि बाईंच्या पाया पडतात..*

अजय:

हमें आशीर्वाद दीजिए..

विद्या:

पैरी पोना ससुरजी..

शिवदे गुरूजी:

ससुरजी? यह कऊन ससुरा आ गया ससुर बनके? हा थिल्लरपणा नि पोरकटपणा बंद करा!

मानकर बाई:

आता हो गुरूजी?

शिवदे गुरूजी:

नुसते गळयात हार घातले म्हणजे शास्त्रानुसार विवाह संपन्न होय नाही. विवाह म्हणजे मनोमिलन असे आम्ही आधी म्हणाले असू पण ते पूर्ण सत्य नव्हते. ग्रहताऱ्यांच्या मर्जीविरूद्ध उचललेले एक पाऊल ही शास्त्रसंमतीस पात्र नाही.

मानकर बाई:

पण इथे तर वरमाला घालण्यास पाऊल नव्हे, हात उचलले गेले आहेत!

शिवदे गुरूजी:

बाई, शास्त्राचा अर्थ हा शब्दार्थ नसून भावार्थ असतो. त्यास विविध कंगोरे असतात. परिस्थितीनुसार त्याचा अर्थ लावणे हेच तर आमच्या सारख्या शास्त्र्याचे काम! त्यामुळे सद्य परिस्थितीत वरमाला नि वधूमाला गळयात

पडल्या तरी सून म्हणून ह्या मुलीचे गळयात पडणे यास शास्त्राची म्हणजे प्रत्यक्ष आमची मंजुरी नाही!

मानकर बाई:

मग काय तर! मान न मान.. मुझे जावई मान! बाई बाई! थोडेतरी ठेवावे ना भान!

शिवदे गुरूजी:

अरे, नादान मुलांनो, कुठे फेडाल हे पाप?

अजय:

भेटेल जेव्हा आकाशातला बाप!

शिवदे गुरूजी:

पूर्वजांना कुठल्या तोंडाने सांगू आम्ही की त्यांची उज्ज्वल परंपरा ह्या शिवदे गुरूजींनी कायम राखली? कुठे गेली ती उच्च परंपरा? कुठे गेले ते आमच्या उच्च उज्ज्वल परंपरेचे तेज? कुठे झाकोळली गेली प्रभा?

अजय:

पण जे व्हायचे ते घडून गेले. आकाशस्थ शक्तींना साक्षीस ठेऊन झाले. परदेशी जाणाऱ्यास महत्वाच्या अशा फ़ॉरेन एक्सचेंजहून देखील महत्वाचे असे हे गारलँड एक्सचेंज झाले! आता विवाहबंधनासच न मानण्याचा अधार्मिक

व्यवहार? तो ही प्रत्यक्ष आमच्या ज्योतिर्भास्कर पिताश्रींनी करण्याची गोष्ट करावी? इतके अधार्मिक वर्तन? विद्ये, पड अजून एकदा पाया नि कर आपल्या विवाहाचा मजबूत पाया! आपली मेहनत नको जायला वाया!

विद्या:

हो रे अजय राया! सात जन्म मीच तुझी जाया!

शिवदे गुरूजी:

अजयसाहेब, विसरेन मी सर्व माया! आमच्या इच्छेच्या विपरीत वागणाऱ्यास या घरात स्थान नाही..

अजय:

स्थान नाही म्हणजे? आम्ही प्रस्थान करावे?

विद्या:

प्रस्थान? अजय, हा प्रश्न अस्थानी आहे रे! होणार सून मी या घरची!

मानकर बाई:

सुले! हेच शिकवले मी तुला? कार्टीला शिकवले हीच चूक झाली. शिंगं फुटलीत नि शिंग मोडून वासरात शिरली पोर!

अजय:

सासुबाई! ही म्हण तशी शिंगावरून आलीय, तुम्ही घ्या तिला शिंगावर! तिचा अर्थ इथे चपखल असो की नसो! नका घेऊ मनावर!

मानकर बाई:

एकतर माझ्या पोरीला फूस लावली.. गुणाची ती सुलू. या मवाल्याच्या पोराच्या नादी लागली..

शिवदे गुरूजी:

बाई! मी मवाली? कोणत्या अंगाने? ह्या सात्विक चेहऱ्यात मवालित्व कुठे दिसले? अगदी साजुक तुपासारखा सात्विक हा तुकतुकीत चेहरा..

मानकर बाई:

बाई बाई! घोळ झाला गुरूजी! बोलण्याच्या नादात विसरलेच! क्षमा असावी.. सुले, या मवाल्याच्या नादी लागलीस?

शिवदे गुरूजी:

हे ठीक! मवाली! भौतिक शास्त्र शिकतोय.. आम्ही सात फेरे उलटे मारायला लावतो.. हा विवाह होणे नाही..

प्रकाश परत विजय वर

विजय:

आता आली पंचाईत! शिवदे गुरूजींना हार्ट ॲटॅक आणला तर? पण होऊन गेलंय ते लग्न .. काळाचे काटे मागे फिरवता येणार नाहीत! हार्ट ॲटॅक त्यांनी आधीच आणवला असता तर? मग ब्लॅक मेलिंग करायला उपयोग झाला असता! किंवा मानकरबाईंच्या मानेला असाध्य दुखणे जडवले असते.. मग दोन्ही घरचा मान राखला गेला असता! पण जो हो गया सो हो गया! आता काय?

*प्रकाश परत मुख्य स्टेजवर*

मानकर बाई:

म्हणजे? तशी सोय आहे शास्त्रात?

शिवदे गुरूजी:

अर्थात! फार पुढारलेलंय ते शास्त्र! काळाच्या पुढे पाहणारं.. शास्त्रच ते! त्यास अशा पाखंडाची पूर्वकल्पना असणारच. समाजाच्या अगिनगाडीस रूळावर

ठेवायचे असेल तर यम नियम कसोशीने पाळावयासच हवेत. आणि समाजातील एकेका घटकाने जर ते पाळायचे ठरवले तर समाजरथ सुरळीत चालण्यात काय अडचण? पण नाही! काही स्वत:स शहाणे समजणारे असे या अजयसाहेबासारखे लोक समाजमन नासवत आहेत. प्रत्यक्ष ह्या शास्त्र्याच्या घरी पाखंड. आम्ही तसे मजबूत आहोत नाहीतर म्हणालो असतो, हा दिन पाहण्याअगोदर त्या भगवंताघरी गेलो असतो तर बरे झाले असते..

मानकर बाई:

गुरूजी असं बोलू नये. आपल्यासारखे आदर्शच समाजास तारून नेतील. या विद्येच्या अविद्येने सारा गोंधळ घातलाय..

शिवदे गुरूजी:

आणि आमचा पुत्र ही काही कमी नाही! भौतिकशास्त्र शिकतोय! इथे ग्रहताऱ्यांचा परिणाम मोजतोय मी नि हा म्हणे त्यांच्यासाठी असलेल्या गणितीय नियमांचा अभ्यास करतोय. वर हे असले थेर..

मानकर बाई:

गुरूजी, तुम्ही ह्या लग्नाला तेवढं रद्द करून टाका..

विद्या:

म्हणजे? कॉम्प्युटरसारखं अन डू?

अजय:

पण त्यात री डू चा ऑप्शन असतोच! रिवाइंड करून हे गळ्यातील हार काढून टाकले तरी आपण ते परत घालू शकतो..

मानकर बाई:

बाई बाई.. हद्द झाली..

अजय:

मग टाका करून हद्दपार!

शिवदे गुरूजी:

नाही! अशातशाने प्राॅब्लेम सुटत नाही. भ्रष्टाकार बोळाळतो.. आम्हाला तरी सध्या उपाय सुचत नाही!

*प्रकाश परत विजय वर*

विजय:

तर आता काय?

इतकी कथा सांगून राजा विक्रमाला वेताळाने  प्रश्न विचारला, बोल राजा यांचे पुढे काय होईल?

बोल, कुठे जाणार हे अजयिद्याच्या लव्हस्टोरीचे तारू? ते सामाजिक परिस्थितीच्या अजस्त्र खडकावर आपटून टायटॅनिक सारखे बुडणार की प्रेम म्हणजे प्रेम असतं म्हणत प्रेमाच्याच अश्वशक्तीनं तरून किनाऱ्यास लागणार? बोल राजा विक्रमा!

विक्रम विचार करतो. प्रथम बोलायचे नाही ठरवतो. ओठ घट्ट मिटतो. पण शेवटी त्याला राहवत नाहीच.

विक्रमादित्य वदता होतो,

सद्य विषय आहे अजय विद्याची प्रेमकथा.. नाटकास एक गोष्ट असते. तिला बरा वाईट, सुख किंवा दु:खांत असतो. पण हे खरे आयुष्य आहे, नाटक नव्हे! इथे काही गोष्टी रबरासारख्या ताणल्या जातात. काही तशाच ताण्याबाण्यांसह ताणलेल्या राहतात किंवा ठेवल्या जातात, ताणलेल्या अवस्थेत. काही तुटतात. काही भिजत घोंगड्यासारख्या लटकत राहतात. एका सफल कथेमागे दहा

असफल कथा असतात. त्यांच्यामागे अशी सामाजिक, धार्मिक, पारंपारिक नि रूढी वगैरेंची सॉलिड कारणं असली तर मग बघायलाच नको! तेव्हा ही कथा ही अशीच संपेल. वेताळा, तुझ्यासारखीच ह्या कथेतील पात्रं अनंत काळ लटकून राहतील. पण अविचारी प्रेमाची शिक्षा अजय नि विद्या यांनी भोगत रहावी हेच त्यांच्या प्रारब्धातच लिहिले असेल तर त्यास काय इलाज? हे सारे नशिबाचे भोग. नि गतजन्मीच्या पापकर्मांची सजा. ती कोणाला चुकलीय. सटवाईच्या ललाटरेखेला ओलांडणे कोणास जमलेय? तेव्हा अजय नि विद्या असे वर्षानुवर्षे प्रेमाची शिक्षा भोगत राहतील.. मग प्रेमाची महती सांगणारे भलेही ह्यांच्या कथानकावर नाटक वा चित्रपटासारख्या कलाकृती बनवतील.. असफल असले तरी प्रेमाच्या महत्तेचे सारेच टाळ्या पिटत गुणगान करतील.

आणि मग समाजरथ ही डौलाने रूढी नि परंपरांच्या फडफडणाऱ्या पताका मिरवत पुढे जात राहिल.. नि समाजधुरीण त्या रथाच्या चाकांमध्ये वंगण घालून तो धडाधडा धावावा.. अगदी खडखड आवाज न करता, याची काळजी घेत राहतील..

विक्रमाचे उत्तर ऐकून वेताळ ही पुनश्च लटकतो झाडावर. अगदी आपल्या नायक नायिकेसारखा..

असफल प्रेमाची गोष्ट अपूर्ण राहिल.

पण..

अपूर्ण गोष्टीत ही एक पूर्णत्व असते म्हणतात.. कोण म्हणतात? ठाऊक नाही! पण हे वचन ऐकावयास चांगले वाटते! वचने कशी चमकदार हवीत.. तसे हे ही एक!

आणि वचनें किं दरिद्रता?

आम्ही सुविचार, सुवचन नि सुभाषितांचा अखंड रतीब लावू शकतो! आणि कमलपुष्पासम त्या सुभाषितांच्या अर्थापासून अलिप्त ही राहू शकतो! अर्थात सुभाषित नि वचनांस कर्दमाची उपमा देता नाही येणार.. किंवा असे म्हणू.. अळवाच्या पानावरच्या दवबिंदूसारखे ह्या सुविचारी वचनांचे बिंदू आमच्या मनात न चिकटता आम्ही निसटू देऊ शकतो.. आणि आम्ही ते दवबिंदूचे अनुपम सौंदर्य न्याहाळत आम्ही कोरडे ही राहू शकतो! अगदी लोकां सांगू ब्रह्मज्ञान आणि आपण कोरडे अळू पान!

मग तुम्ही म्हणाल..

आता या कथेचे काय?

कसले काय!

अजय असता तर म्हणाला असता..

कसलं काय नि नाकात दोन पाय!

तरं हे असं आहे, असं होणार.. होणारच.. याचा अंदाज तिसऱ्यास येतो. प्रत्यक्ष नायक नायिकांस नाही.. अजय नि विद्या.. जब प्यार करे कोई तो देखे केवल धन! हे त्यांना कळू नये? पण मुद्दा तेवढाच नाही! पिढ्यानपिढ्या चालत आलेल्या अंधश्रद्धांचं करायचं काय? करणी, भानामती, भुताटकी वगैरे सॉलिड अंधश्रद्धा तर दिसतात चुकीच्या, सामान्य माणसास ही तशाच दिसतात, पण हे बुवाबाजीचं साम्राज्य विस्तारतंय दिवसेंदिवस. धर्म नि श्रद्धा नि अंधश्रद्धा, साऱ्याची गफलत होतेय. होतेय की संबंधित करून देताहेत? त्यांना सत्पुरूष मानावे.. पण या सत्पुरुषाच्या वागण्यातल्या विसंगतीकडे श्रद्धेच्या नावाखाली दुर्लक्ष करावे इतका आंधळेपणा यावा? का? आपापली मने इतकी दुर्बल व्हावी की तार्किक अतार्किक काय हे या पारलौकिकाच्या नावाखाली आपल्याला समजूही नये? इतके मानसिक दौर्बल्य का असावे? केवळ अज्ञाताच्या भीतीपोटी? आज कोणास ठाऊक की उद्या काय होईल.. सूर्य उगवेल हे सत्य.. नवा दिवस उगवेल हे सत्य.. पण त्याच्या पोटात घडेल ते काय? मग त्या भविष्याच्या भीतीपायी वर्तमानाचा विनाश करून घ्यावा? अगदी साध्या साध्या

गोष्टीतही माणसास हा तथाकथित श्रद्धेचा पांगुळगाडा लागावा? राहू काल काय, मुहुर्त काय.. नारळं फोडणं काय की येता जाता महापूजा घालणं काय.. उत्सवाच्या नावाखाली धुडगूस काय.. या सर्वात तो जगन्नियंता कुठे आला? ही त्याची नि धर्माची उपासना करण्याची पद्धत की प्रत्यक्ष त्याचा अपमान? नवस बोलण्यातली लाचखोरी प्रत्यक्ष त्याला मानवी नव्हे तर भ्रष्टाचारी मानवी पातळीपर्यंत आणून ठेवते हे माणसास कळते पण वळत नाही की इतके वैचारिक मंदपण आले आहे जे लोक अभिमानाने मिरवतात?

समोर आहेत ते प्रश्नच प्रश्न!

प्रेमाची महती सांगणाऱ्या संस्कृतीत इतरांबद्दल इतका द्वेष का?

कर्म करत रहा सांगणारे मागच्या जन्माची कर्मे उकरून काढून का या जन्माला अप्लाय करतात? आणि या जन्मातला हिशेब या जन्मीच का संपवत नाहीत? कि ते उकरून काढणे हेच या जन्मीचे कर्म?

दोन डोळे दोन कान एक तोंड एक नाक दोन पाय दोन हात असणारी सबंध मानव जात एक आहे हे निरक्षर गाडगेमहाराजांना कळलं पण या शिक्षित विद्वान समाजास का नाही कळत? की कळतं पण वळत नाही?

संतांची पूजा करत आम्ही त्यांची शिकवण का मानत नाही?

कबीरापासून तुकारामापर्यंत संतमंडळी सांगून गेलेत.. मानवतेचा उपदेश करणारे ते.. आम्ही त्यांना महान मानतो नि त्यांच्या उपदेशाकडे सोयिस्कर कानाडोळा करतो?

किती वर्षे आम्ही माणसामाणसात भेदभाव करणार नि उच्च नीचच्या काल्पनिक नीच कल्पनांत समाजास अडकवणार?

प्रश्नच प्रश्न!

प्रश्न खूप आहेत!

ते संपणार कधी हा देखील एक प्रश्न आहे.

प्रश्न आहेत सत्राशे साठ.. तेवढे नसतील तर किमान साठ!

तर ही आहे साठा प्रश्नांची कहाणी!

ही कथा तशी अपूर्ण असली तरी संपूर्ण होतेय इथेच.

इस रात की सुबह नहीं म्हणतात तसेच काही.. इन प्रश्नोंका कोई उत्तर नही!

तेव्हा ही साठा प्रश्नांची निरूत्तरी कहाणी.. असफलं अपूर्णं..

आणि तरी ही संपूर्णं!



डॉ. नितीन मोरे यांची ५२+२ प्रकाशित पुस्तके

यांच्या कव्हरवर क्लिक करताच (नेट असल्यास) पुस्तक उघडेल.




















डॉ. नितीन मोरे
२अंकी बालनाट्य



लाडोबा
डॉ. नितीन मोरे



डॉ. नितीन मोरे
INSTANT
कालिदास



ब्र


डॉ. नितीन मोरे
तेवढं सोडून बोला
एकपात्री नाटक


डॉ. नितीन मोरे


डॉ. नितीन मोरे


एका डॉक्टरची
कोविडकथा
डॉ. नितीन मोरे



डॉ. नितीन मोरे
न केलेली भाषणे
बोललो तर बोलाल की बोलतो

चक्रमादित्य भाग १ ते ५


यांच्या कव्हरवर क्लिक करताच (नेट असल्यास) पुस्तक उघडेल.





डॉ. नितीन मोरे
मुघले ते शोले
Version 2.0.2.0






HOSTEL-I


डॉ. नितीन मोरे
व्यक्ती आणि कथा २



डॉ. नितीन मोरे
व्यक्ती आणि कथा





डॉ. नितीन मोरे
व्यक्ती आणि कथा ३




डॉ. नितीन मोरे










डॉ. नितीन मोरे
आणि


डॉ. नितीन मोरे


डॉ. नितीन मोरे
वाळूतील
रेषा

राजा दरबारी
डॉ. नितीन मोरे

डॉ. नितीन मोरे

डॉ. नितीन मोरे
नाच जमूरे नाच

डॉ. नितीन मोरे
आधुनिक कहाण्या

डॉ. नितीन मोरे

डॉ. नितीन मोरे

डॉ. नितीन मोरे

डॉ. नितीन मोरे
घरात

डॉ. नितीन मोरे

डॉ. नितीन मोरे
सांगतो
ऐका

डॉ. नितीन मोरे
केल्याने

डॉ. नितीन मोरे

डॉ. नितीन मोरे


डॉ. नितीन मोरे
कविता



डॉ. नितीन मोरे
मी मेल्याबिया बोलते
अभिवाचक : अंजना लगस (8208834250)
कानगोष्टी


डॉ. नितीन मोरे
मी मेल्याबिया बोलते



डॉ. नितीन मोरे
मी मेल्याबिया बोलते
अभिवाचक व तज्ञ : अंजना लगस



डॉ. नितीन मोरे
'इका'गाईच्या कविता


डॉ. नितीन मोरे
रोमिओची 'परी'कथा


डॉ. नितीन मोरे
ऐसी अक्षरे


Jackson!


सुलट
डॉ. नितीन मोरे


डॉ. नितीन मोरे
ऑर्वेलच्या फार्मात!

# ई साहित्य प्रतिष्ठानचे हे सोळावे वर्ष

# डॉ. नितीन मोरे यांचे हे बावन्नावे पुस्तक.

या पुस्तकाबरोबरच डॉ. नितीन मोरे यांचे मनःपूर्वक अभिनंदन. डॉ. नितीन मोरे एक यशस्वी श्वसनरोगतज्ञ आहेत आणि एक उत्साही लेखकही. त्यांच्या लेखनात एक टवटवी असते. ते बालसाहित्यही लिहितात आणि तरुणांसाठीही. गंभीरही लिहितात आणि विनोदीही. त्यांचा विनोद कोणाच्या व्यंगावर आधारित नसतो, स्तर सोडत नाही. समाजातील अनिष्ट विसंगतीवर ते आपल्या विनोदातून नेमकं बोट ठेवतात. समझदार वाचकांना त्यांचा इशारा काफ़ी असतो. त्यामुळे त्यांच्या नर्म विनोदाचा एक फ़ॅनवर्ग निर्माण झाला आहे. ते फ़क्त विनोदी साहित्य नव्हे तर निरनिराळया प्रकारचे लेखन लिहीतात. त्यांनी गेली अनेक वर्षे आपले लेखन निरंतर चालू ठेवले आहे. त्यांना प्रकाशक मिळायला तोटा नाही. पण त्यांना आपली पुस्तके जास्तीत जास्त लोकांपर्यंत नेणारे आणि प्रकाशनप्रक्रिया सुलभ असणारे प्रकाशन हवे होते. त्यांनी ई साहित्यची निवड केली.

डॉ. नितीन मोरे यांच्यासारखे ज्येष्ठ लेखक आपली पुस्तके ई साहित्य-च्या माध्यमातून जगभरातील मराठी वाचकांना विनामूल्य देतात. असे लेखक ज्यांना लेखन हीच भक्ती असते. आणि त्यातून कसलीही अभिलाषा नसते. मराठी भाषेच्या सुदैवाने गेली दोन हजार वर्षे कवीराज नरेंद्र, संत ज्ञानेश्वर, संत तुकारामांपासून ही परंपरा सुरू आहे. अखंड. दिनानाथ मनोहर(४ पुस्तके), शंभू गणपुले (९पुस्तके), डॉ. मुरलीधर जावडेकर (९), डॉ. वसंत बागुल (१९), शुभांगी पासेबंद (१५), अविनाश

नगरकर (४), डॉ. स्मिता दामले (९), डॉ. नितीन मोरे (५२ पुस्तके), अनील वाकणकर (९), फ्रान्सिस आल्मेडा (२), मधुकर सोनावणे (१२), अनंत पावसकर (६), मधू शिरगांवकर (८), अशोक कोठारे (४७ खंडांचे महाभारत), श्री. विजय पांढरे (ज्ञानेश्वरी भावार्थ), मोहन मद्वण्णा (जागतिक कीर्तीचे वैज्ञानिक), संगीता जोशी (आद्य गझलकारा, १८ पुस्तके), विनीता देशपांडे (७), उल्हास हरी जोशी (७), नंदिनी देशमुख (५), डॉ. सुजाता चव्हाण (११), डॉ. वृषाली जोशी (५०), डॉ. निर्मलकुमार फडकुले (१९), CA पुनम संगवी (७), डॉ. नंदिनी धारगळकर (१५), अंकुश शिंगाडे (३५), आनंद देशपांडे (३), नीलिमा कुलकर्णी (२), अनामिका बोरकर (३), अरुण फडके (६), स्वाती पाचपांडे (२), साहेबराव जवंजाळ (२), अरुण वि. देशपांडे (५), दिगंबर आळशी, प्रा. लक्ष्मण भोळे, अरुंधती बापट (२), अरुण कुळकर्णी (१२), जगदिश खांदेवाले (६), पंकज कोटलवार (६), डॉ. सुरुची नाईक (३), डॉ. वीरेंद्र ताटके(२), आसावरी काकडे (१४), श्याम कुलकर्णी (२०), किशोर कुलकर्णी, रामदास खरे (५), अतुल देशपांडे, लक्ष्मण भोळे, दत्तात्रय भापकर, मुग्धा कर्णिक (४), मंगेश चौधरी, प्र. सु. हिरुरकर (३), बंकटलाल जाजू (३), प्रवीण ना दवणे, आर्या जोशी, डॉ. सरोज सहस्रबुद्धे (७), अरविंद बुधकर (४), जयश्री पटवर्धन (४), श्रीरंग कौलगी (४), यशवंत कदम (८), पांडुरंग सूर्यवंशी (४), सुधीर कारखान्नीस (३), मिलिंद कपाळे, मुकुंद कर्णिक (३), श्रीराम काळे (२), शैलेश पुरोहित (४), बी बी देसाई (२), श्रीनिवास शारंगपाणी (३)असे अनेक ज्येष्ठ व अनुभवी, कसलेले लेखक ई साहित्याच्या द्वारे आपली पुस्तके लाखो लोकांपर्यंत विनामूल्य पोहोचवतात.

अशा साहित्यमूर्तींच्या त्यागातूनच एक दिवस मराठीचा साहित्य वृक्ष जागतिक पटलावर आपली ध्वजा फडकवील याची आम्हाला खात्री आहे. यात ई साहित्य प्रतिष्ठान एकटे नाही. ही एक मोठी चळवळ आहे. अनेक नवनवीन व्यासपीठे उभी रहात आहेत. त्या त्या व्यासपीठांतून नवनवीन लेखक उदयाला येत आहेत. आणि या सर्वांचा सामूहिक स्वर गगनाला भिडून म्हणतो आहे.

आणि ग्रंथोपजीविये। विशेषीं लोकीं "ई"यें।

दृष्टादृष्ट विजयें। होआवे जी।

esahity@gmail.com

www.esahity.com

**9869674820** (for free books on whatsapp)